# प्रकरण दुसरे

# दलित आत्मलेखन प्रेरणा आणि स्वरुप

# प्रकरण २ रे
# ''दलित आत्मलेखन प्रेरणा आणि स्वरुप''

'दलित साहित्य' ही स्वातंत्र्य प्राप्तीनंतरची वाङ्मयीन चळवळ आहे. परंतु ही चळवळ केवळ निखळ वाङ्मयीन चळवळ नसून तिचा आपला सामाजिक परिवर्तनाशी फार घनिष्ठ संबंध आहे.) मराठी साहित्यात जे विविध वाङ्मय प्रवाह निर्माण झाले आहेत त्यात दलित साहित्याचा प्रवाह अनेक वाचक, समीक्षक यांचे लक्ष वेधून घ्यायला समर्थ ठरला आहे. मराठी साहित्याच्या निळ्या क्षितिजावर दलित साहित्याचा रुपाने निळी पहाट उदयाला आली आहे. कथा, कादंबरी, चरित्र, आत्मचरित्र इ. माध्यमातून उपेक्षितांचे जीवन हे साहित्य चित्रित करीत आहे, या दलित मुक नायकाला नव्यानेच वाचा फुटल्यामुळे आजपर्यंतच्या जीवनात ते जसे जगले, त्यांनी जे सोसले, भोगले ते आत्मनिष्ठपणे सांगण्याची गरज अल्पशिक्षित, शिक्षित दलितांना वाटू लागली आणि 'दलित आत्मकथन' हा वाङ्मय प्रकार मराठी साहित्यात अवतीर्ण झाला. ही 'आत्मकथने' रुढ मराठी साहित्यातील 'आत्मचरित्र' या वाङ्मय प्रकाराहून वेगळी आहेत. ही आत्मकथने काय किंवा इतर दलित साहित्याचे प्रकार काय या सर्व साहित्यामागे जी भूमिका आहे, ज्या काही प्रेरणा आहे, त्या समजून घेण्याखेरीज दलित आत्मकथनाचे नेमके स्वरुप लक्षात येणार नाहीत.

दलित आत्मकथनाचा विचार करताना 'दलित साहित्य' या प्रवाहातील 'दलित' या विषेशणाचा सर्वप्रथम विचार करावा लागतो. 'दलित' या शब्दामागे आर्थिक व सामाजिक दृष्ट्या मागासलेपणा हा अर्थ आपल्या मनात उभा राहतो. यासाठी अनेकांनी 'दलित' या शब्दाच्या व्याख्या करण्याचा प्रयत्न केला आहे त्याचा विचार करावा लागतो.

डॉ. म. ना. वानखेडे यांच्या मतानुसार 'दलित शब्दांची व्याख्या केवळ बौद्ध अथवा मागासवर्गीय नव्हे तर जे जे पिळले गेलेले श्रमजीवी आहेत ते सर्व दलित या व्याख्येत समाविष्ट होतात.'[१]

डॉ. स. दा. कऱ्हाडे यांनी 'आर्थिक दृष्ठ्या व सामाजिक दृष्ट्या मिळून एक सर्व समावेशक दलित वर्ग मानता येईल. त्यात कामगार, शेतमजूर, उपजिवीकेसाठी श्रमणारे आणि अस्पृष्यही येतील म्हणजेच ज्यांची पिळवणूक होते ते दलित अशी व्याख्या केली आहे.'[२]

नामदेव ढसाळांनी 'दलित म्हणजे अनुसुचित जाती जमाती, बौद्ध, कष्टकरी जनता, कामगार, भूमीहीन शेतमजूर, गरीब शेतकरी, भटक्या जमाती, आदिवासी इ. ना दलित म्हटले जावे' असे मत मांडलेले आहे.[३]

प्रा. गो. म. कुलकर्णी यांनी 'दलित ही संज्ञा वस्तुतः समाजाच्या तळागाळात रुतून बसलेल्या सर्वच उपेक्षित जनसमुहाला लागू पडणारी, समाजाच्या अध:स्तरात वावरणाऱ्या सर्व व्यक्तींना लागू पडणारी आहे' असे म्हटले आहे.[४]

तर दलित शब्दाची व्याख्या करताना बाबुराव बागूल म्हणतात, 'दलित हा आजच्या युगाचा नायक आहे, हा आजच्या सबंध क्रांतीकारक उलथापालथीचे केंद्र आहे. दलित म्हणजेच क्रांतीकारक, दलित म्हणजेच सम्यक परिवर्तन'[५]

'दलित जाणिवेचे साहित्य' या लेखात डॉ. योगेंद्र मेश्राम म्हणतात, 'माणसाला लढाऊपणाचे तेज, विद्रोहाची ताकद, माणूसकीने व जीवन सुंदरपणे जगण्याची इच्छा, प्रेरणा देणारा क्रांतीचे स्फुरण ठरलेला 'दलित शब्द' वाच्यार्थ्याने प्रतीत होणारा नुसता निष्फळ शब्द नसून त्याला शेकडो वर्षाचा जिता-जिवंत असा इतिहास आहे. त्या शब्दामागे एक संपुर्ण सामाजिक जीवन उभे आहे. त्याला त्या जीवनाच्या उत्क्रांतीचा मुल्यगर्भ-गर्द संदर्भ आहे'[६]

वरील सर्व व्याख्यांचा विचार करता 'दलित' या शब्दप्रयोगाद्वारा आर्थिक, सामाजिक व सास्कृंतिक मागासलेपण व त्यातून येणारे दुबळेपण सुचित केलेले आहे. तर काहींना सामाजिक मागासलेपणाच्या जातीवाचक अर्थानेच ही शब्दयोजना करावीशी वाटलेली आहे.

वास्तविक दलित हा शब्द विशिष्ट जातीपुरताच मर्यादित करणे योग्य नाही. 'दलितत्व' हे वेगवेगळ्या ठिकाणी सर्वत्र कमी अधिक प्रमाणात पहावयास मिळते. समर्थांच्या उक्तीप्रमाणे

'जगी सर्व सुखी असा कोण आहे' या न्यायाने 'या जगी कोण शोषीत नाही' हे शोधावे लागते. कारण या आधुनिकीकरणाच्या रेट्यात प्रत्येकाचे शोषण कोठे ना कोठे चालुच आहे. फक्त स्वरुप आणि तीव्रता कमी जास्त एवढाच फरक आहे.

अशा प्रकारे दलितांविषयीच्या समस्यांमधून दलित साहित्याची निर्मीती झालेली आहे व ही साहित्य निर्मीती करणारा लेखक म्हणजे केवळ अस्पृश्यांपैकी कोणताही एकाच वर्गातील नव्हे तर अनेक

जातींनी साहित्य प्रांतात प्रवेश केल्यामुळे सर्वच मागासवर्गीय जातीचा 'दलित' या संज्ञेचा समावेश केला पाहिजे. म्हणून रा. ग. जाधव म्हणतात, 'दलित हा शब्द गर्भार आहे. दलित शब्दच नव्या अर्थाने व अर्थव्यतेने भारून टाकेल त्याच्या आसपास फिरु नका. तो अपत्य संभवाच्या नाजूक अवस्थेत आहे.'[७] ते सार्थ वाटते.

म्हणजेच 'दलित' या व्यापक संज्ञेत कोणा कोणाला समाविष्ट करायचे ते निश्चित करणे अवघड आहे. पण आज तरी 'दलित' या संकल्पनांचा विचार करताना जातिवाचकते पासून ते गुणवाचकतेपर्यंत या संज्ञाची व्याप्ती वाढवली आहे असेच दिसते.

'दलित' या विशेषणाचा विचार करता जे जे पिळले गेले, रुढी, परंपरा, संस्कृती धर्माने त्यांचे माणूसपण नाकारले त्यांना दलित म्हणावे व त्यांनी लिहलेले जे साहित्य ते 'दलित साहित्य' होय असेच म्हणावे लागते. या साहित्यात नकार, विद्रोह, वेदना, मानव मध्यमावर्तीत्व, अनात्मवाद आणि अनीश्वरवाद, गतिवाद, ज्ञानविज्ञान आणि त्यांच्या योग्य उपयोगासाठी सत्ता, अर्थसत्ता दलितांच्या हातात असणे हे सम्यक क्रांतीची सुक्ते आहेत. तेच दलित साहित्य आहे. ते आशावादी आहे. असे आपणाला दिसून येते.

अशा दलित साहित्यात 'कविता' आणि 'आत्मकथन' या लेखनप्रकारातून जास्त लेखन झालेले आहे असे आपणाला दिसून येते. त्यातही 'आत्मकथन' या लेखनप्रकारातून जास्त लेखन झालेले आहे हे लेखन आत्मचरित्र व आठवणी या साहित्य रुपाना जवळचे वाटणारे, तरीही या लेखनाची एक आगळी वेगळी प्रत आहे, ध्येये आहेत, धारणा आहेत ही वस्तुस्थिती आहे. या लेखनाकडे आत्मचरित्र म्हणूनच सामान्यता पाहिले गेले. पण या लेखकांची लेखनामागची भूमिका ही आत्मचरित्राहून भिन्न आहे कारण आत्मचरित्र हे कोणत्या तरी एखाद्या क्षेत्रात यशस्वी ठरलेल्या, उत्तुंग यश मिळविलेल्या व्यक्तिने पुर्वायुश्यातील सुखद स्मृति, घटना आठवून वृद्धापकाळ सुखमय आनंदमय करण्याचा, आयुष्याच्या हिंदोळ्यावर पुन्हा पुन्हा स्मृतीरुपी झोके घेण्याचा प्रयत्न हे लेखन करुन होत असतो. समृद्ध, सफल जीवनाची गाथा त्यात असते. 'स्व' च्या संबंधीची सर्व माहिती तेथे असते. त्यात सातत्य असते शेवटही असतो. पूर्णत्वाचा प्रत्यय हे आत्मचरित्र देते. याउलट 'आत्मकथनात' 'स्व' बरोबरच 'स्वसमाज' प्रदेश, सामाजिक संस्था, भोगलेले, साहिलेले, संस्कृतीने, धर्माने, रुढी परंपरेने, नाकारलेले जे जे काही असते ते ते आत्मकथनात असते. आयुष्याची वाटचाल करताना कोणत्याही टप्प्यावर लिहीले जाते. त्याचा लेखक महान असतोच असे नाही. त्याच्या

सुरुवातीलाही काही नियम नसतात. या लेखनातून त्रिकालाचे दर्शन घडते. लेखकाला ते घडवायचे असते. तेथे लेखक हा नाममात्र असतो. आपली जात, समाज यांच्यात या लेखनातून परिवर्तन घडवून आणण्याचा त्याचा सुप्त हेतू असतो. समाजाच्या खुरटेपणाचा, समाज व्यवस्थेत गुंतलेल्या संदर्भाचा शोध घेणे, भुतकाळातील परंपराचा शोध, रहस्ये शोधण्याचा प्रयत्न करणे, वर्तमानाचा पुर्नविचार करुन भविष्याचा वेध घेणे व स्वसमाजाचे आत्मभान जागृत करुन मानसिकता बदलवून त्यांना विचारप्रवृत्त करणे हे या आत्मकथनाचे स्वरुप असते. म्हणूनच हे आत्मकथन 'सामाजिक दस्तऐवज' स्वरुपी बनलेले असते. म्हणून दलित लेखकाच्या आत्मपर साहित्य रुपाचा आकृतिबंध निश्चितपणे ओळखण्यासाठी व या लेखनाला स्वतंत्र अस्तित्व 'आयडेंटिटी' प्राप्त होण्यासाठी व या साहित्य रुपाच्या यथार्थ आकलनाच्या दृष्टीने 'आत्मकथन' हीच संज्ञा योग्य वाटते.

म्हणजेच 'समाज व्यवस्थेमुळे आर्थिक व सामाजिक विषमतेतून निर्माण झालेल्या आत्मदुराव्यामुळे, सत्वाचे भान जागृत होवून आपल्या व आपल्या समाजाच्या स्वदेशाच्या, स्वदेशातील संस्कृती, धर्मग्रंथ, काव्य, महाकाव्याची लक्तरे वेशीवर टांगणारे व 'स्व' तसेच 'स्वेतर' जाती समाजाचे मानसिक प्रबोधन व परिवर्तन घडवून आणण्याच्या सुप्त हेतूने लिहलेले आत्मपर स्वरुपाचे पण रुढ आत्मचरित्राहून वेगळे साहित्य रुप स्विकारणारे लेखन म्हणजेच दलित आत्मकथन होय.'

या आत्मकथनाला प्रा. डॉ. सौ. कुसरे कुलकर्णी व यशवंत मनोहरानी 'स्वकथन' हे विशेषण लावलेले आहे.[८] पण त्यांचे मत आपल्याला स्विकारता येत नाही. कारण या आत्मकथनातून 'स्व' व स्वबरोबरच 'स्व समाज' आहे हे खरेच आहे. पण त्याबरोबरच ज्या संस्कृती, रुढी, परंपरेने मनुने त्यांना अस्पृश्य बनविले त्याविरुद्ध वेदना, विद्रोह, नकार आहे. ज्या देवाची युगानयुगे भक्ती केली पण त्याला स्पर्श करता आला नाही त्या देवाला, धर्माला, राष्ट्राला शिव्या दिल्या आहेत. त्यांच्याविषयी विद्रोहाची भावना आहे. म्हणजेच या आत्मकथनात फक्त 'स्व' व 'स्वसमाज' असे चित्र नसून जीवनाच्या विविध घटकाविषयीचे चिंतन, विद्रोहाची भावना दिसून येते म्हणून 'स्वकथन' हे जे विशेषण लावलेले आहे ते यथार्थ वाटत नाही व अनेक लेखकांनी आपल्या लेखनाला 'आत्मकथा'[९] असेच नाव दिले आहे. बहुतांशी लेखक तरुण वयातील असल्यामुळे अनेकांनी दोन-दोन आत्मकथने लिहीली आहेत. त्यातून आपल्या आस्मितेचा शोध घेऊन अस्तित्वाचा अर्थ समजून घ्यायचा आहे. आपल्या जातीचे स्थान निर्माण करुन, परिवर्तन घडवून आणायचे आहे. आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय कुचंबना संपली पाहिजे. माणसाचे माणूसपण नाकारणारी

संस्कृती व तिचा मनू बदलला पाहिजे हीच त्यांची भूमिका असून त्यामुळेच त्यात पिडित व पीडक समाजाच्या दोन्ही अंगाची चित्रे येतात. गेल्या तीन चार दशकात अनेक आत्मकथने वाचकासमोर आली. त्यांनी समाजाला, वाचकाला प्रश्नांकित केले. अशा या लेखनाचे ध्येय कोणते ? आकांक्षा कोणत्या ? कोणत्या व कोणाच्या तत्वज्ञानाचा पुरस्कार या लेखकाने केला आहे ? कोणत्या प्रेरणा या लेखनामागे आहेत ? या लेखनाची सद्य:स्थिती व भविष्यकाळ इ. विषयीचे तटस्थपणे, वस्तुनिष्टपणे अवलोकन करणे गरजेचे आहे.

१) **डॉ. आंबेडकरांची विचार प्रणाली** : दलित साहित्य हे सर्वसाधारणपणे ईश्वर, आत्मा, कर्मविपाक, आध्यात्म, वर्ण व जातीव्यवस्था इ.ना नाकारते कारण या व्यवस्थेमुळेच आपणाला गावकुसाबाहेरचे जीवन जगावे लागले. ही त्यांची भावना आहे. जातीबंधने तोडून मानव मुक्तीचा मार्ग मोकळा करावयाचा आहे. स्वातंत्र्योत्तर काळातील मराठी साहित्यात सर्वार्थाने बदल घडविण्याची दलित साहित्याची आकांक्षा आहे. भूमीवर भाजलेला जीवनानुभव घेवून तेजाबात लेखणी बुडवून दलित साहित्यिक लेखन करीत आहेत. ते एका सामुहिक लढ्याबरोबर समोर येत आहे. ते एक बलिष्ट तत्त्वज्ञान भूमीत रुजवत आहेत. त्यासाठी साहित्याचा साधन म्हणून वापर होत आहे.

व जे घडले, घडत आहे त्यामागे डॉ. आंबेडकरांचे कार्य व विचारप्रणाली कारणीभूत आहे. बाबासाहेबांनी अस्पृश्यांना हिंदू परंपरा, रुढी, वाईट चालीरिती याविरुद्ध बंड करायला लावले. बलुतेदारी तोडून स्वतंत्र जीवन जगण्याचा उपदेश केला. (१९२७ सालचा चवदार तळ्याचा सत्याग्रह, मनूस्मृतिचे दहन, १९३० मधील गोलमेज परिषदेतील दलितांच्या हक्काची मागणी, नाशिक येथील काळाराम मंदिर प्रवेशाचा ऐतिहासिक सत्याग्रह, १९३५ साली येवले मुक्कामी धर्मांतराची केलेली घोषणा व १९५६ साली प्रत्यक्षात केलेले धर्मांतर या साऱ्या क्रांतीकारक स्थित्यंतरामागे डॉ. आंबेडकरांनी मानवमुक्तीचा मार्ग दलितांना दाखवला) स्वातंत्र्य, समता, बंधुतेचे महत्व समाजासमोर ठेवले. मानवी अस्मितेच्या व स्वाभिमानाच्या जागृतीमुळेच जीवनाच्या सर्व क्षेत्रात सामाजिक परिवर्तन घडवून आणता येते असा आत्मविश्वास त्यांनी निर्माण केला. 'शिका, संघटित व्हा, संघर्ष करा' हा महान मंत्र त्यांनी दिला)

डॉ. आंबेडकरांच्या या विचारप्रणालीचा पुरस्कार दलित साहित्यांने केला व आरतीसन्मुख होवून माणसाची आरती गाण्यासाठी हे साहित्य जन्माला आले म्हणून ताराचंद खांडेकर यांनी दलित साहित्याचे ललितपण किंवा त्यांची सौंदर्यविषयक जाणीव ही डॉ. आंबेडकरांनी विकसित केलेल्या जीवन निष्ठांतून

व्यक्त होणारे आहे. असे नमूद केले आहे. तर शंकरराव खरातानींही 'समाज परिवर्तनाचे समता, बंधुता, स्वातंत्र्य, न्याय, प्रज्ञा, शील, करुणा अशा अमुल्य मुल्यावर आधारलेली नवसमाजाची निर्मितीची नवी विधायक दृष्टी डॉ. आंबेडकरांनी दिली. म्हणून तर डॉ. आंबेडकरांचे विचार आणि जीवन दलित साहित्याच्या प्रेरणा आहेत असे म्हटले आहे.'[१०]

२) **महात्मा ज्योतिबा फुले यांची विचारप्रणाली** : महात्मा फुले हे प्रस्थापितांच्या विरुद्ध आवाज उठविणारे पहिले महापुरुष आहेत. हिंदुधर्मातील मानसिक व सामाजिक गुलामगिरीविरुद्ध त्यांनी शिक्षण, समानता व समान संधी यासाठी बंड पुकारले. १८४८ साली शुद्रातिशुद्रांसाठी मुलींची शाळा काढली. १८६३ मध्ये बालहत्या प्रतिबंधक गृह स्थापन केले. अस्पृश्यांसाठी घरचा पाण्याचा हौद मोकळा केला. विधवा पुर्नविवाहाला सहाय्य केले. मानवी स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. सामाजिक समतेसाठी आयुष्य खर्ची घातले. शिक्षणामुळेच मानवी प्रगती घडून येईल आणि मानवाची मानसिकता बदलेल म्हणून शिक्षणाचा प्रसार करण्याचा जीवापाड प्रयत्न केला. दलित आणि पीडित समाजाच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक अशा सर्व उन्नयनासाठी ते प्रयत्नशील राहिले. महात्मा फुले यांनी धर्म, वर्ण, जात, पापपुण्याची कल्पना, स्त्रीपुरषासंबंधीचे विचार सडेतोडपणे मांडले. समता, बंधुत्व या तत्त्वाचे महत्व ओळखून मनुष्याला बंधनात कोंडणाऱ्या समाज व्यवस्थेचा त्यांनी धिक्कार केला. म्हणूनच पददलितांना माणूस म्हणून जगण्याची प्रेरणा मिळाली. महात्मा फुल्यांचा या विचारसरणीचा खोल परिणाम डॉ. आंबेडकरांच्या विचारावर झालेला होता. महात्मा ज्योतिबांच्या कार्याने प्रकाशमय जीवनाची चाहूल दलितांना लागली म्हणून

'काळोखाला दिवस गेले,
आता भविष्य सुखाचे असेल'[११]

हा आत्मविश्वास निर्माण झाला. डॉ. आंबेडकरांच्या रुपानेच महात्मा फुल्यांचे विचार दलितांनी स्वीकारले. महात्मा फुले यांच्या विचाराचे स्वतंत्र अस्तित्व दलित साहित्यातून स्पष्टपणे जाणवत नसले तरी त्यामुळे महात्मा फुल्यांचे महत्त्व कमी होत नाही.

३) **भगवान गौतम बुद्धांची विचार प्रणाली** : दलित साहित्याच्या जडणघडणीत भ. बुद्धाच्या विचारप्रणालीचा फार मोठा वाटा आहे. इतर सर्व धर्म संस्थापकापेक्षा भगवान बुद्धांची प्रेरणा दलितांनी स्वीकारली. कारण बुद्धानेच अस्पृश्यांना जवळ केले होते. कर्मकांड, यज्ञयाग, मुर्तिपूजा यांना नकार

देऊन मानवातील महानतेचा गौरव बुद्धाला अभिप्रेत होता. त्यामुळेच डॉ. आंबेडकरांनी त्यांना गुरुस्थानी मानले. महात्मा बुद्धाने सद्वर्तन व नैतिक आचरण यांना प्राधान्य देऊन सर्वांविषयी समभावाची दृष्टी स्वीकारली. शुद्रातिशुद्रांना संघात प्रवेश असल्याने प्रत्येक व्यक्तिस बुद्धसंघ व बुद्धधर्म मुक्त द्वार ठरला. जातीव्यवस्थेविरुद्ध हे एक प्रकारचे आक्रमणच होते. बुद्ध धर्माची भूमिका ही समतेच्या पायावर उभी असल्यामुळे डॉ. आंबेडकरांना ती उपयुक्त वाटली.

इ.स.पूर्व ६२४ मध्ये जन्मलेल्या बुद्धाने माणसाच्या दुःखाचा उगम तृष्णेत असल्याचे सांगून त्या तृष्णेपासून मुक्तता लाभावी म्हणून अष्टांग मार्ग सुचविला. सुख दुःखाची कारणे सांगून चार आर्यसत्येही सांगितली. माणसाजवळ केवळ सत्ता, संपत्ती, बुद्धी, शक्ती असून भागत नाही. तर त्याला सहानुभूतीपूर्ण अंत:करणाची जोड असणे आवश्यक आहे. जुने धर्ममार्तंड हे उलट्या हृदयाचे होते. याउलट बुद्धाने आपल्या हृदयात सर्वांना स्थान दिले. 'कोणीही तुम्हाला मुक्त होण्यासाठी सहाय्य करु शकणार नाही. स्वत:ला सहाय्य करा. स्वत:च्या प्रयत्नानी मुक्ती लाभाची कास धरा.'[१२]

हीच शिकवण डॉ. आंबेडकरांना आवडली. त्यामुळेच सत्याची शिकवण देणारा मानवतेचा महान संदेश देणारा गौतम बुद्ध, आंबेडकर आणि दलितांचे प्रेरणास्थान, श्रद्धास्थान बनला. आपल्या सर्व ध्येयउद्दिष्टांची पूर्ती बुद्ध धर्म करणार असल्याची खात्री त्यांना होती.

४) **मार्क्सवादी विचारप्रणाली** : १९ व्या शतकात भांडवलशाहीच्या अतिरेकामुळे कार्ल मार्क्स या विचारवंताने साम्यवादाचा पुरस्कार केला. 'भांडवलशाही समाजव्यवस्थेतील अनेक दोषाची जाणीव होऊन कोट्यावधी दलितांना त्या समाजव्यवस्थेत भोगाव्या लागणाऱ्या हालअपेष्टाबद्दल कळवळा येऊन त्यांना त्या दुःखापासून कायमचे मुक्त करावे हा साम्यवादी प्रमेयाच्या मांडणीतील सर्वात महत्त्वाचा हेतू होता.'[१३]

मार्क्सवादाने एक ऐतिहासिक व वस्तुनिष्ठ दृष्टी जगाला दिली. ही सृष्टी ईश्वरी वरदान नसुन ती जड वस्तुतून विकसित झाली आहे असा भौतिकवादी दृष्टीकोण मार्क्सने स्वीकारला. कामगाराने संघटीत भांडवलशाहीविरुद्ध संघर्ष करण्याचे आवाहन मार्क्सने केले. समाजाचा घटक म्हणून स्त्रीपुरुषांना आपआपला विकास साधता येतो. शोषकाविरुद्ध संघर्ष केल्याशिवाय शोषितांची प्रगती होणार नाही. ही मार्क्सची भूमिका होती. व शोषक व शोषितामधील अंतर मार्क्सने दूर करण्याचा प्रयत्न केला.

याचवेळी डॉ. आंबेडकरांनी मार्क्सवादी विचाराला भारतीय समाजव्यवस्थेच्या संदर्भात जे नवे वळण दिले. ते स्वीकारुन मार्क्सवादी जाणीवा दलित साहित्यातून अभिव्यक्त होवू लागल्या. दलितांना केवळ द्रारिद्रयासाठी प्रस्थापितांशी संघर्ष करुन चालणार नव्हते. तर येथील जातीय व्यवस्थेलाच त्यांना आव्हान द्यायचे होते म्हणून दलित साहित्यीकांनी आपला लढा आर्थिक आणि सामाजिक विषमता या दोन पातळ्यावरुन चालू ठेवला त्यांचे प्रतिबींब त्यांच्या साहित्यातून पडणे साहजिकच आहे. म्हणूनच दया पवारांनी 'कोंडवाडा' या काव्यसंग्रहाच्या प्रस्तावनेत 'शब्द हे क्रांतीकारक असू शकतात, शब्दांनी सत्ता डळमळते'[१४] ही जाणीव मार्क्सवादी अण्णाभाऊ साठे, नारायण सुर्वे यांच्यामुळे निर्माण झाल्याचे नमूद केले आहे. व दया पवारांच्या

''तुम्हीच प्रकाशाचे पुंजके व्हा,
अन् क्रांतीचा जयजयकार करा''[१५]

ही घोषणा किंवा फ. मु. शिंदे यांच्या

''चंद्राचं फुल देऊन सत्कार करील आकाश,
तेव्हा तु बोलशील चांदण्या सर्वांच्याच आहेत''[१६]

किंवा 'ऑक्टोबर क्रांती' आणि लेनिनचा देश आणि साम्याच्या लिपीतील वेद'' हे सारे संदर्भ मार्क्सवादाशी नाते सांगणारे आहेत.

एकंदरीत दलित साहित्यामागे आंबेडकरी प्रेरणा प्रधान असली तरी या साहित्यातून कमी अधिक प्रमाणात मार्क्सवादी विचारकण विखुरलेले आढळतात. निदान प्रारंभी तरी आर्थिक शोषणाला बळी पडणाऱ्या या दलित वर्गाला मार्क्स हा प्रेषितच वाटला. दलित साहित्यातून आढळून येणारा नकार आणि विद्रोह म्हणजे मार्क्स या आदर्श समाज व्यवस्थेच्या कल्पनांना मुर्तरुप देण्यासाठी चालविलेल्या संघर्षाची प्रधान सुत्रे होती. दलित लेखकाच्या आत्मकथनातून दारिद्र्य आणि भुकेचे चित्रण आलेले आहे. त्यामागे डॉ. आंबेडकरांनी स्वीकारलेली मार्क्सची परिवर्तीत विचारसरणीच प्रेरक ठरलेली आहे.

४.१ दलित साहित्याच्या निर्मितीमागील प्रेरणा स्तोत्राचा विचार करीत असताना डॉ. आंबेडकर, भगवान बुद्ध, कार्ल मार्क्स इ. विचाराबरोबरच कर्मवीर भाऊराव पाटील व संत गाडगे बाबा यांच्या प्रेरणांचाही

विचार करावा लागतो. रयत शिक्षण संस्थेच्या अधिपत्याखाली ठिकठिकाणी शाळा, महाविद्यालये, वसतिगृहे व कमवा शिका योजना सुरु करुन भाऊरावांनी बहुजन समाजापर्यंत शिक्षण पोहोचविले. अनेक दलित मंडळी या प्रवाहात आली. शिक्षण घेऊन मोठ्या पदावर विराजमान झाली. व एक प्रकारचे आत्मभान जागृत झाले. सामुहिकता त्यांच्यात निर्माण झाली. म्हणून भाऊराव पाटलांचे योगदान या संदर्भात मोठे आहे.

गाडगे महाराजांनीही आपल्या किर्तनातून 'देवाला बळी देवू नका, मांस मच्छर खावू नका, मुला बाळांना शिक्षण द्या, कर्ज काढून लग्न करु नका, देव माणसांत आहे, प्रामाणिकपणे कष्ट करा' असा जो संदेश दिला त्यातून दलितांच्या मध्ये एक प्रकारची जाणीव निर्माण झाली. म्हणून डॉ. आंबेडकर, बुद्ध, फुले, मार्क्स आणि चोखामेळा इ. प्रमाणेच भाऊराव पाटील इ.च्या प्रेरणा मान्य कराव्या लागतात.

असे असले तरी या साहित्यामागील प्रेरणांचा विचार करताना त्यासंबंधीच्या मतमतांतरांचा विचार करावा लागतो. कारण दलित लेखक व समीक्षक यापैकी काहींनी दलित साहित्यामागील प्रेरणा स्तोत्र हे केवळ आंबेडकर असल्याचे मानलेले आहे. तर काहींनी मार्क्सलाही मान्यता दिली आहे. व डॉ. सदा. कऱ्हाडे यांनी 'मार्क्स आणि आंबेडकर वादाच्या समन्वयानेच परिवर्तनाला गती येवू शकते.'[१७] असा साम्यवादी विचार व्यक्त केला आहे. याउलट टोकाची भूमिका ल.स. रोकडे यांनी घेतलेली दिसते. 'मार्क्सवाद ही एक विकृती आहे, ती मानव मनात शिरु न देण्यासाठी बौद्ध धर्म हा एक निवारक उपाय आहे. दलित साहित्यात कुठलेही अक्षर बाबासाहेबांच्या विचारप्रणालींना डावलून जात असेल तर ते अक्षर ते साहित्यिक व साहित्य ही आमचे नाही.'[१८] तर भाई माधवराव बागल यांनी अस्मिता दर्शाच्या पाचव्या मेळाव्यात ''महात्मा फुलेंनी ईश्वर या कल्पनेला टाकून दिले नाही तर त्याची पूजा अर्चा होवू नये म्हणून त्याला 'निर्मिक' असे नाव दिले आहे म्हणून डॉ. आंबेडकरच आम्हाला मार्गदर्शक वाटतात.''[१९] असा विचार व्यक्त करुन महात्मा फुले यांच्या प्रेरणा अमान्य केल्या आहेत.

याप्रमाणे शंकरराव खरातांनी मार्क्सवादी प्रेरणा नाकारली, तर मुक्ति बोधानी ती स्वीकारली. मुक्ति बोधाप्रमाणे वि. स. जोग यांनी मार्क्सवादी प्रेरणा मान्य करताना 'मार्क्सवाद समाज परिवर्तन घडविणारे साहित्य उत्कट मानतो. नवे स्वीकारण्याची प्रेरणा मार्क्स देतो. एकाच जागी साकाळलेल्या विचाराचा प्रवाह वाट काढून मोकळा करणे मार्क्स मुळेच शक्य आहे. म्हणून दलित साहित्याने मार्क्सच्या

प्रेरणेपासून दूर जाता कामा नये. डॉ. आंबेडकरांचे तत्त्वज्ञान दलित साहित्य व दलित चळवळीचा विकास करण्यास अपूरे पडते. दलितांना बाबासाहेबांच्या मार्गावरुन पुढे नेणे हे मार्क्सवादाचे काम आहे.'[२०] असा उदार दृष्टीकोण स्वीकारला आहे.

एकंदरीत दलित साहित्य निर्मितीमागील प्रेरणांचा विचार करता तसेच त्या संबंधीची मतमतांतरे लक्षात घेता दलित आत्मकथनासह सर्व दलित साहित्यात आंबेडकर, बुद्ध, मार्क्स, कर्मवीर भाऊराव पाटील, गाडगे महाराजांच्या प्रेरणा कमी अधिक प्रमाणात प्रभावी आहेत असेच आपणाला दिसून येते. व एकूणच दलित साहित्याला अपेक्षित असणारी आर्थिक, सामाजिक शोषण मुक्त स्थिती निर्माण करण्यासाठी ज्या सिद्धांताची व प्रेरणांची आवश्यकता असेल त्याचा त्याचा सातत्याने स्वीकार करीत राहणे हेच या साहित्याच्या प्रगतीच्या व सुजाण समृद्धीच्या दृष्टीने आवश्यक आहे. एखाद्या प्रेरणेविषयी पूर्वगृह दुषित दृष्टीकोन व आपपर भाव बाळगणे हे साहित्याच्या दृष्टीने हितावह नाही. व या सर्व प्रेरणा माणूस हाच केंद्रबिंदू असून त्याचा उद्धार हेच महत्वाचे उद्दिष्ट आहे. त्यामुळे ज्या साहित्यिकाला जी विचारसरणी महत्वाची वाटेल त्यानुसार त्याने आपले लेखन करावे हेच योग्य ठरते.

अशा प्रकारे दलित साहित्यातील 'दलित' या संज्ञेचा विचार व या साहित्य निर्मितीमागील प्रेरणांचा विचार केल्यानंतर दलित साहित्याची प्रेरणाच 'दलित आत्मकथनां' च्या पाठीमागे आहे असे आपणाला दिसून येते. दलित आत्मकथन हा या साहित्याचा एक अविभाज्य भाग आहे हे स्वीकारावे लागते. अशा या आत्मकथनांचा पसारा गेल्या तीन चार दशकात वेगाने वाढला व आपण भोगलेले, सोसलेले जीवनात यश मिळवताना आलेले अनुभव व माणूस असूनही रुढीने, परंपरेने नाकारलेले माणूसपण, कोरभर भाकरीच्या तुकड्यासाठी दिवसदिवसभर सवर्णांच्या दारात उभे राहिल्यानंतरची वेदना, तांब्याभर पाण्यासाठी मैलोन्‌मैल अनवाणी केलेली पायपीट, शेतमजूरी करीत असताना सवर्णांनी आपल्या स्त्रीयांचा घेतलेला उपभोग इ. जीवन कोणाला तरी सांगावे व दु:ख हलके करावे. आपल्या वेदनेला वाचा फोडावी, प्रस्थापिताविरुद्ध विद्रोह व नकाराची भावना व्यक्त करावी. हाच विचार या लेखनाच्या पाठीमागे आहे. याच प्रेरणेतून सर्वप्रथम 'बलुतं'[२१] या आत्मकथनाचा जन्म झाला. दया पवार यांनी लिहीलेल्या या आत्मकथनाने मराठी साहित्यात आत्मकथन लेखनाचा मार्ग सुकर झाला. फोर्ड फाऊंडेशनचे अॅवार्ड मिळाले. हिंदी, कन्नड, गुजराती या भाषांप्रमाणेच जपानी, जर्मनी या भाषांमध्येही अनुवाद झाल्यामुळे मोठी प्रसिद्धी 'बलुतं' ला मिळाली. यावरच 'अत्याचार' नावाचा चित्रपट निघाला. मराठी साहित्याला पर्यायाने दलित साहित्याला 'बलुतंमुळे' नवीन जाणिवा, नवीन अनुभव अभिव्यक्त करण्याचे एक प्रभावी असे वाङ्मय रुप उपलब्ध झाले.

या आत्मकथनात लेखकाने 'स्व'बरोबरच 'स्वसमाजाचा' काटेरी प्रवास वर्णन केला आहे. दगडू मारुती पवाराचा कवी दया पवार होईपर्यंत व बालपण व किशोरपण येथील समाज व्यवस्थेमुळे कसे करपले, जातीयतेच्या असंख्या इंगळ्या कशा डसल्या, अंधश्रद्धामय वातावरणात बाल्य व किशोर अवस्था, शिक्षणाची आवड, नवनवीन अनुभव, निसर्ग शरीर बदलाचे वर्णन यात आहे. व ज्या समाजात आपण जन्मलो त्या समजाच्या रुढी, परंपरा, समजूती, आचार, विचार, धार्मिक विधी, जात पंचायती इ.चे उल्लेख यात येतात. समाज व्यवस्थेतील बलुतेदारीचे दु:ख यात विशेषत्वाने वर्णन केले आहे.

'बलुतं' हे दया पवार या पुर्वास्पृश्य लेखकाने लिहीलेले पहिले आत्मकथन आहे. आत्मपर कादंबरीच्या अंगाने हे लेखन लिहल्यामुळे बलुतला एक नवा आकृतिबंध प्राप्त झाला आहे. लेखन रितीचा एक नवा आदर्श मराठी साहित्यात उदयास आला आहे. यातून लेखकाचा यातनामय भूतकाळ नवनवीन अनुभव व जाणिवांच्या सोबतच माणसाच्या मुलभूत जाणिवाही बलुतंमधून व्यक्त होताना दिसतात. दया पवारांच्या या आत्मशोधाला सामाजिक व आर्थिक गुंतागुंतीचे संदर्भ आहेत.

'बलुतं' हे जसे दया पवारांचे तसे त्यांच्या अपमानीत समाजाचेही आहे.

**आठवणीचे पक्षी :** प्र. ई. सोनकांबळे[११] यांचे हे आत्मकथन औरंगाबाद येथे भरलेल्या तिसऱ्या दलित साहित्य संमेलनात प्रसिद्ध झाले. डॉ. नारायण रणसुबे यांनी ''यादों के पंछी'' या नावाने ते हिंदीत रुपांतर केलेले आहे. महाराष्ट्र शासनाचे उत्कृष्ठ साहित्य निर्मितीचे १९७९-८० चे पारितोषिक ही या आत्मकथनाला मिळाले आहे. एका अत्यंत संवेदनाशील मनाची तळमळ व्यक्त करणारे, शाळकरी प्रल्हादवर येथील समाज व्यवस्थेने 'अशुभ गांडीचा म्हारडा' म्हणून तिरस्कृत पणे पाहिले. पोटासाठी बिदवा भरणे, शेण काढणे, मळा राखणे पडेल ते काम करुनही शिळी भाकरी मिळविणे प्रल्हादच्या नशिबी कसे होते, याला जाती व्यवस्था कशी कारणीभूत होती. या व्यवस्थेने सर्वच मागासलेल्या समाजाच्या परिवर्तनाचे दरवाजे कसे बंद करुन टाकले होते. या आठवणींना यात उजाळा दिलेला आहे.

प्र. ई. नी दलित जीवनाचे दैन्य, दास्य, दु:ख व्यक्त केले आहे. आर्थिक, सामाजिक, विषमता किती भयंकर रुपात येथे वावरत आहे, अन् दलित जीवन भूकेच्या आगीने कसे होरपळत आहे. याची एक लेखमाला यात गुंफलेली असून जीवनातील अनेक भयानक खडतर अनुभवाचे नागडे उघडे चित्र यात असून यातील अनुभव आपल्या महारी बोलीत मोठ्या धिटाईने व मोकळेपणाने सांगितले आहे. यात महारी भाषेबद्दल त्यांना सार्थ अभिमान आहे. दलित जीवनाची अंतररुपे व्यक्त करताना त्यांनी त्यात काहीही

अधिक ऊणे केलेले नाही. तर सर्व पात्राकडे ते मायाळूपणे पाहतात. त्यांना कोणी दुष्ट वाटत नाही. तसेच कोणीही पतित वाटत नाही. जीवनाचा अर्क ज्याने पचविला आहे त्याच सहिष्णु वृत्तीने हे लेखन झाले आहे. चिंतनशीलतेचा जागोजाग प्रत्यय येतो. म्हणूनच बागुलांनी लिहले आहे की, 'प्र.ई. यांचा पहिला लेख प्रकाशित झाला आणि अनेकांना वाटू लागले, मला तरी वाटते मराठी साहित्याला जीवनाभिमुख करणारा स्वदेशी करणारा, युग समान करणारा समर्थ लेखक उदयाला आला.'[२३]

भाष्य न करणे, प्रसंगांना भडक न करता नाट्य निर्मिती व कृत्रिम कला कुसरीपासून दूर रहाण्याचे बंधन त्यांनी कटाक्षाने पाळले. सरळ निवेदन व सहजपणा हा त्यांचा शैलीचा विशेष आहे.

**मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे :** माधव कोंडविलकर [२४] या जातीने चांभार असणाऱ्या लेखकाने आपल्या जीवनाची अवस्था यात उत्तमप्रकारे व्यक्त केली आहे.

'त्यांनी गाववाल्याची सेवा करावी आणि सराईला प्रत्येक घरात जाऊन मळणी जमवून जगायचे, अन्याय होवो, नाहीतर अत्याचार होवो त्यांनी आपली वाचा कधी बोलकी करायची नाही. पुढ्यात आलेल्या वहाणेला फक्त टाके घालावे. फाटली का ? म्हणून कधी विचारायचे नाही.' अशी स्थिती असणाऱ्या चांभार जीवनाचे चित्रण केले आहे.

१९६९ ते १९७७ या आठ वर्षाच्या काळात शिक्षकाची नौकरी करताना आलेले अनुभव लेखकाने चित्रित केलेले आहे. मात्र त्यावर भाष्य केलेले नाही. जातीमुळे प्राप्त होणाऱ्या वेदना मांडताना कोठेही आत्मसमर्थन वृत्ती, विद्रोही भावना नाही. एक प्रकारच्या तटस्थ वृत्तीचे दर्शन येथे घडते.

प्रस्तुत आत्मकथनात रोजनीशी पद्धतीचा उपयोग केलेला आहे. 'देवाचे गोठणे' येथे रुजू झाल्यावर परिस्थितीचा जाच सहन न होवून 'एका अस्पृश्य शिक्षकाची कथा आणि व्यथा' ह्या शिर्षकाचे पत्र वर्तमान पत्रात प्रसिद्ध केले. त्यामुळे गाव बिथरले व लेखकाला सरळ करण्याचे बोलू लागले. तेव्हापासून एकलकोंडेपणा आला. त्यातून वाचन पू. ल. देशपांडे, गंगाधर पानतावणे, केशव मेश्राम, शंकर वैद्य यांच्याशी पत्रव्यवहार व मैत्रीचे नाते निर्माण झाले. 'देवाचे गोठणे' मधील जीवन म्हणजे एका पुर्वास्पृश्याच्या होणाऱ्या मानसिक छळाची कथा आणि व्यथा आहे. यात सामाजिक जीवनाचे दर्शन घडते व शिक्षिताचे ग्रामिण जीवनातील प्रगत शैक्षणिक वातावरणाच्या अभावामुळे होणाऱ्या कोंडमाऱ्याचे दर्शनही घडते. कोकणी चांभारी बोलीचा वापर संवादासाठी कोंडविलकराने केलेला आहे. त्यामुळे भाषेचे नाविन्य हेही या आत्मकथनाचे

वैशिष्ट्य आहे. लेखकाच्या जीवनाच्या आठ वर्षाच्या कहाणीतून एका बाजूने त्यांचे तडफडणारे मन तर दुसऱ्या बाजूला सोशिक मन उत्कटपणे व्यक्त होते. स्वत: लेखकानी म्हटल्याप्रमाणे त्यांचा त्रिशंकू झाला आहे. कच्ची रापवणी झालेल्या चामड्यागत लेखकाच्या आयुष्याची परवड झालेली आढळते. अनेकदा त्यांची मानसिक कुचंबनाही झालेली आहे. समाज व्यवस्थेच्या प्रवाहाविरुद्ध जाण्याच्या प्रयत्नात लेखक थकल्यासारखा वाटतो. जातीप्रथेप्रमाणे त्याला पूजाअर्चा, दारु पिणे, भक्ताकडे जाणे इ. गोष्टी स्वत:च्या मनाविरुद्ध कराव्या लागतात. पण त्यांना झुगारुन देण्याची हिम्मत त्यांच्यात नाहीत. म्हणून वि. श. चौगुले म्हणतात त्याप्रमाणे 'सहजपणे व्यक्त होणाऱ्या अनुभवातील कारुण्य, वेदना व अगतिकता यांचा प्रत्यय येताच वाचकाने अंर्तमुख व्हावे असे या लेखनाचे रुप आहे.'[२५]

अशा प्रकारे कलात्मक जाणीवा संभाळून प्रौढ भाषेत निवेदन व राजापुरी बहुजन समाजातील भाषेचा उपयोग संवादातून केलेला आहे. यातील मी कलावंतावर कुठेही मात करताना दिसत नाही हे या आत्मकथनाचे वैशिष्ट्य आहे.

**उपरा :** लक्ष्मण माने [२६] डॉ. आंबेडकरांच्या प्रेरणेने निर्माण झालेले वैचारिक व वाङ्मयीन वातावरण, शिक्षणाने निर्माण झालेली अस्मिता या समाजाला माणूसपण मिळवनू देण्याकरीता केलेला दृढ निश्चय, दलित साहित्याची चळवळ, समाजवादी चळवळ, युवक क्रांतीदलाचे काम या सर्वांचा परिपाक आणि विवेकपूर्ण अविष्कार म्हणजे उपरा आत्मकथन होय. लक्ष्मण मानेंचे हे आत्मकथन जीवन परिवर्तन घडवून आणण्यासाठी त्यांनी केलेल्या संघर्षाचे चित्रण येते. (हा संघर्ष जसा व्यक्तिगत तसा त्यांच्या कैकाडी समाजाचाही आहे. गाढवाच्या पाठीवर सारा संसार बसवायचा, काळूबाई, यल्लमा, लमान या देवाची नावे मनात जपायची. एका गावात जास्त दिवस थांबायचे नाही. भल्या पहाटे हा संसार आणि जित्राब घेऊन गावाला सोडायचे कारण महार आडवा आला म्हणजे अशुभ होतं असा हा परंपराग्रस्त कैकाडी समाज दु:ख व वेदना सोशीत जीवनाची वाटचाल करीत आहे.

या आत्मकथनातून लेखकाचा जीवनप्रवास आलेला असला तरी आपल्या जातीच्या जीवनाची रखरख आणि होरपळही वर्णन केलेली आहे. कैकाडी समाज त्यांच्या चालीरिती अंधश्रद्धा, स्त्रीजीवन, जातपंचायती इ. चे चित्रण या त साकार झालेले आहे. समाज जीवनातील दारिद्र्याचे चित्रण आलेले असून, ठरलेल्या गावामध्ये गावकऱ्यांना कंड्या, झाप, कुड, डपऱ्या इ. साहित्य पुरविणे आणि त्या मोबदल्यात शिळ्या पाक्या अन्नाची याचना करणे तसेच सुगीचे दिवसात खळ्यावर जावून शेतकऱ्याने दिलेले

घेणे पावसाळा संपला की, गाढवे घेऊन गावोगाव भटकायचे, फोक आणून कापायचे, कणग्या तयार करायच्या त्या विकून उदरनिर्वाह करायचा. असे यात कैकाडी समाजाचे जीवन वास्तवदर्शी अभिव्यक्त झाले आहे.

'उपरा' या आत्मकथनाच्या निमित्ताने मराठी साहित्यात उपेक्षित असणारे एक नवे जीवन, नव्या अनुभवानिशी वाचकासमोर आले. याविषयी बा. ह. कल्याणकर म्हणतात, ''सर्वार्थाने मुक्या जीवनभोवऱ्यात गरगरणाऱ्या समूह जीवनाचे अक्षरकलेत दाखल झाल्याचा हा प्रत्यय म्हणजे 'उपरा' होय.''[२७] माने यांनी कैकाडी समाजाच्या वेदनांना शब्दाकार दिला व स्वत:चा तोल ढळू न देता कटू अनुभवाच्या तीव्र झळीनी संवेदना होरपळू न देता त्यांनी जे लेखन केले आहे त्यामुळे 'उपरा' हे एका वाङ्मयीन कलाकृतीच्या पाळीवर गेले आहे. यातील भाषेत नाट्यात्मकता आणि स्वाभाविक लय आढळते. कैकाड्याची भाषा, अशुध्द ग्रामीण भाषा, नागरी भाषा अशी भाषेची तीन रुपे उपरात आहेत.

**'काट्यावरची पोटं'** उत्तम बंडू तुपे. [२८] दलित लेखकांच्या आत्मकथनात बहुतांशी लेखक मंडळी ही पूर्वाश्रमीच्या महार जातीमधील आहेत. पण उत्तम बंडू तुपे या मातंग समाजातील लेखकाने अत्यंत तटस्थपणे अस्पृश्यता व दारिद्र्य याविरुध्द सतत संघर्ष करणाऱ्या मातंग जमातीच्या लोकांची दु:खे 'काट्यावरची पोटं'त अत्यंत प्रांजळ व सहज शब्दात चित्रित केली आहेत. तुपे आणि त्यांच्या समाजाची वेदना येथे व्यापक रूप घेताना दिसते. जन्मामुळे आलेली अस्पृश्यता, लहानपणी जाणवलेले वेगळेपण व नंतरचा जातीचा पाठपुरावा यामुळे जाणवलेली भयावहता इत्यादि चित्रण यात आलेले आहे.

वाङ्मयाच्या निर्मितीसाठी विशिष्ठ सामाजिक, आर्थिक स्थिती ही आवश्यक असते. अशी कोणतीही सुस्थिती नसताना तुपेनी आपल्या अनुभूतीचे अविष्करण करताना अत्यंत शांत चित्ताने स्वसमाजाच्या वेदना साकार केल्या आहेत. त्याबरोबरच आपण आपले पोट भरण्यासाठी कोणते पराक्रम केले याचाही तपशील यात आहे. ''वास्तविक फड ओढण्याचे काम, बरबडण्याचे काम परंपरेने मांगाचे परंतु सातारकरांचा फडाचा धंदा बघून, श्रीगोंदा येथील माणसेही कुणबावा नसल्याने फड ओढू लागली. मांग समाज या फडाच्या कुरणाजवळ वस्तीला आला होता, त्यानंतर श्रीगोंद्याजवळच्या आवटेवाडीला जावे लागले. तेथेही हाच व्यवसाय करावा लागायचा. लहान मुले फड ओरबडायला जायची तेंव्हा काट्याची भिती वाटायची मग पांढरी उन्हाळी उपटून, ठेचून डोहात टाकायची. भुललेले मासे पाण्यावर तरंगायचे ते घरी आणून ठेवायचे फड्याच्या कामाबरोबर वाखाचे कामही केले जायचे. दुष्काळाच्या काळात वाकाचे दोर करुनच तुपे कुटुंबाने आपली विवंचना मिटवली होती. आर्थिक परिस्थिती इतकी भयावह की, आंबिल वड्याच्या काठावरील

खाणीत भूताचे देणे म्हणून टाकलेले लिंब, नारळ, धान्याचा रोट, अंड्याचे उतारे पाहून तोंडाला पाणी सुटायचे. मग भूताला टाकलेला उतारा भूत होऊन खायचा. कोणी जिवंत कोंबडा टाकला असला तरी तोही बंडूजी पकडून आणायचा.''

एकंदरीत 'काट्यावरची पोटं' यातून उत्तम बंडू तुपे यांनी काट्याशी संलग्न जीवन जगणाऱ्या मातंग समाजाचेचित्रण व या समाजाची दारिद्र्याशी सतत चाललेली झुंज, जातीमुळे वाट्याला आलेली आगतिकता इत्यादि वास्तव दर्शन घडवून आणली आहे.

**फांजर** - ना. स. झोडगे [२९] एका कार्यकर्त्या व्यक्तीने लिहिलेले हे आत्मकथन आहे. नानासाहेब झोडगे यांनी आपल्या जीवन प्रवासात अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर कशी मात केली ? शिकून पुढे जाण्याचा प्रयत्न कसा केला ? सभोवतालच्या सामाजिक परिस्थितीमुळे कार्यकर्ते म्हणून त्यांचे व्यक्तिमत्व कसे घडत गेले ? या प्रश्नांची उत्तरे या आत्मकथनातून मिळतात. 'फांजर' म्हणजे बाभळ बोराटीचे वाळलेले झुडुप या काटेरी झुडुपाप्रमाणेच लेखकाचा जीवन प्रवास आहे. ना. स. झोडगे यांचे माडगूळ हे 'गोदिरा' ओढ्याच्या काठचे दुष्काळी भागातील गाव आहे. तेथे तीस पस्तीस घराचा महारवाडा. बुध्दवाड्याची ही कहाणी म्हणजेच पर्यायानी लेखकाची जीवनगाथा आहे. तेथील वाळक्या, कांड्या व गवतापासून तयार झालेल्या तनघराच्या या वास्तुत मोठे होऊन घरासमोरील पारावर अभ्यास करुन बी. ए. पर्यंतचे शिक्षण घेतले आहे.

झोडगे हे एक सामाजिक माणदेशी कार्यकर्ते आहेत. ग्रामिण आणि नागर दलित जीवनाच्या दु:खाचे चित्रण यात आलेले आहे. याबरोबरच कार्यकर्ता म्हणून कांही चळवळींचा आलेख त्यांनी मांडला आहे. त्याबरोबरच जिद्द व कष्ट उपसण्याची त्यांची तयारी दिसून येते. मुंबईसारख्या झोपडपट्टीतील जीवनाचे चित्रण यातून त्यांनी कलेले आहे. अशा प्रकारे सोप्या शब्दात लिहिलेले पण थोडे दीर्घ असे एका कार्यकर्त्याचे व सामाजिक परिवर्तनाची अपेक्षा बाळगणाऱ्या एका सुधारणावादी लेखकाचे हे आत्मकथन आहे. पण वाचक समीक्षक यांचे याकडे लक्ष गेले नाही.

**गबाळ** - भारतात पोटासाठी वणवण भटकणाऱ्या कितीतरी जमाती आहेत. विषमता, दारिद्र्य, उपरेपणा अशा त्रिविध तापानी या जमाती शतकानुशतके पोळून निघत आहेत. महार, चांभार, मांग, परधान अशा जातींना ग्रामजीवनात थोडे अस्तित्व तरी आहे. बलुतेदारी आहे त्यांना वस्त्या व गावठाणे आहेत पण भटक्या जमातीला गावकुसही नाही. या भटक्या जाती गावावर अवलंबून राहतात पण गांव त्यांना हिडीसफिडीस करतो त्यामुळे गावाच्या बाहेर हागणदारीमध्ये पाण्याच्या आश्रयाने गावापासून दूर या जातींना रहावे लागते.

नाममात्र उद्योग करुन पोटाची खळगी भरावी लागतात. या जातीमध्ये फासेपारधी, गधेकरी , नंदीबैलवाले, कुडमुडे जोशी, माकडवाले या भटक्या जमाती आहेत. कुडमुडे जोशी हे लोक पिंगळा जोशी म्हणून ओळखले जातात. पिंगळा पक्षाची भाषा त्यांनाा समजते असा समज आहे. सूर्योदयापूर्वी भिक्षा मागणे व सूर्योदयानंतर ज्योतिष सांगून दान मिळवणे हा यांचा व्यवसाय आहे. 'गबाळ' ह्या आत्मकथनात या जातीच्या जीवनाचे वर्णन विस्ताराने आले आहे.

'गबाळ' मधील लेखकाचा जीवनप्रवास तसे पाहता शैक्षणिक प्रगतीचाच प्रवास आहे. वाऱ्यासारखे जीवन जगणाऱ्या आणि गावोगावी भटकणाऱ्या कुडमुडे जोशांच्या भटक्या जमातीचा समांतर प्रवास लेखकाच्या जीवनप्रवासाबरोबर सुरु झालेला आढळतो. 'गबाळ' म्हणजे बिऱ्हाड घोड्याच्या पाठीव बांधून ही कुटुंबे पोटाला मिळेल त्या दिशेला फिरतात. जेथे पोट भरेल ते आपले गाव मानतात. दोन काठ्यावर पोती टाकून तयार केलेले झोपडे म्हणजे यांचे घर. या घरात राहूनही प्रत्येकजण स्वत:चे मोठेपण दाखवण्याचा प्रयत्न करतो. फिरस्तीच्या जीवनामुळे त्यांच्या मुलांना शाळेत घालणे शक्य होत नाही.

'गबाळ' मधील कुडमुडे जोशांचे जीवन अभावग्रस्त आहे. दीवस उजाडण्यापूर्वी भिक्षा मागायची अन् सकाळनंतर भविष्य सांगायचे. हे पुरषाचे कार्य असून स्त्रिया जळण गोळा करणे, लीद, शेण गोळा करणे अशी कामे करतात. लाहन मुले मागायला जातात आलेले धान्य विकून तेल मीठ भागवले जाते. 'भांबा आणि हाडप झोळी ही भिक्षेची साधने कधी एखादे पंचांगही असायचे. लोक सुखी होण्याचे आशेने त्यांना कोंबडी द्यायचे. त्या विकून दोन - चार रुपये या जोशांना मिळायचे, जय चालतयां, लक्ष्मी पावतीया, द्वंद्व वाढतयां, यश मिळतयां' [३०] असे म्हणून भीक मागणे, शिवाय ओढ्यावर जाऊन मासे, खेकडे पकडणे हाही व्यवसाय कांहीजण करतात. समाजातील सर्वांचे जीवन जवळपास असे असते जीवनात प्रतिष्ठा लाभावी, शिक्षण घ्यावे, व्यवसाय करावा ही उमेद दिसत नाही. कारण मार्गदर्शक कुणीही नाही. आणि 'ठेविले अनंत' हीच वृत्त दिसून येते.

अत्यंत साध्या सोप्या भाषेत लिहिलेल्या या 'गबाळात' कुठेही टिपेचा स्वर नाही. आपल्या वाट्याला आलेल्या जीवनाबद्दल लेखक देवाला आणि दैवाला दोष देतो. त्यामुळे लेखकाच्या व समाजाच्या सहनशील वृत्तीचे दर्शन घडते. त्यांच्या परिवर्तनाच्या दृष्टीने कोणीही प्रयत्न करीत नाही ही खेदाची बाब आहे. अत्यंत प्रवाही शैलीत लिहिलेल्या आणि एक नवे समाज दर्शन घडविणाऱ्या या लेखनाकडे फारसे लक्ष अभ्यासकांनी दिलेले दिसत नाही. कदाचित जाती प्रवृत्ती इथेही आडवी आलेली दिसते.

**गावकी** - रुस्तुम अचलखांब यांचे गावकी हे आत्मकथन दलित ग्रामिण संस्कृतीचे चिण करणारे आहेत. गावकी या शिर्षकाला अनुसरुनच ग्रामिण जीवनाचे त्यातील बलुतेदारीचे प्रामुख्याने महाराच्या येस्करकीचे चित्रण लेखक करतो. बलुत मागणाऱ्या प्रमुख जाती, त्यांचे हिस्से वाटप, गावकीची काठी बदलणे, त्याबदलाची पध्दत, हाडकी हाडोळा, महारांची कामे त्यातील साडेबारा जाती, त्यांच्यातील विवाहसंबंध इत्यादिसंबंधी माहिती लेखक सांगतात. (त्याचबरोबर आंबेडकरी विचारांच्या वादळाने उद्‌भवणाऱ्या संघर्षाचे चित्रण लेखक करतो.)

गावकीची काठी दरवर्षी बदलत असे. अखिजीच्या दिवशी काठी देण्याबाबतचा निर्णय जातपंचायत घेत असे या दिवशी बोकड कापावा लागे. घुंगरु असलेली ही काठी येस्करपणा असणाऱ्याकडे जायची. [३१] येस्करपणा पंधरवाडी असायचा त्यांने सांजवेळी गावातून कुटके मागून आणायचे प्रत्येक घराने कुटके देण्याची रीत असल्यामुळे जमलेले कुटके वाळवून त्याचा पुढे उपयोग करायचा. येस्कराला फशी मिळत असे. बाजारातील प्रत्येक दुकानदार ती देत असे. याशिवाय गावकीची इतर कामेही त्याला असत. चावडीवर मालाची रखवाली करणे, वसुली पोहोचविणे, सामान वाहून नेणे, मृत्यूची बातमी पोहोचविणे गस्त घालणे, कामदाराच्या घोड्यापुढे वाट दाखविणे इत्यादि अनेक कामाचा बोजा गावकीत असे. याबरोबरच स्त्री जीवन व विवाहाच्या चालीरिती यात विस्ताराने सांगितल्या आहेत.

गावकी हे अत्यंत प्रांजळ आत्मकथन आहे. पूर्वीच्या ग्रामजीवनातील महार समाजाच्या आचार विचार जीवन रिती समाजातील त्याचे स्थान व वेळोवेळी होणारी उपेक्षा याबरोबरच त्यातील रंभाजीचे व्यक्तीदर्शन थोडक्या शब्दात परिणामकारकपणे उतरले आहे. याबरोबरच 'शिक्षण घ्या' असे रुस्तुमला सांगणे यामुळे रंभाजीच्या व्यक्तीचित्रणाला ठळकपणा येतो. याशिवाय सुंदराभाभी, नामदेव तेली ही पात्रे लक्षणीय आहेत. याबरोबरच जातीयतेच्या काचातून लेखकाची घडलेली मानसिकता, पदव्युत्तर शिक्षणानंतर नाट्यशास्त्र विभागात प्राध्यापक होऊनही गाव आपणाला किंमत देत नाही याचे शल्य या वाचनातून आपणाला कळते. एका बाजूने वर्ण व्यवस्थेची लक्तरे वेशीवर टांगताना स्वत:च्याच महार जातीतील जातीयता, विषमता व इतर बंधनाचा ते धिक्कार करताना दिसतात. (निवेदनातील सहजता हा या आत्मकथनाचा विशेष गुण आहे.)

**आभरान** - (पार्थ पोळके) हे आत्मकथन म्हणजे महार जातीतील पोतराजाच्या जीवनाचे दर्शन घडविणारे आहे.) पोतराज हे या जातीतील अंधश्रध्देचे एक देणे आहे. देवी मरीआईचा कोप ज्या घरात होतो त्या घरात नवसाला मोठा मुलगा पोतराज म्हणून सोडण्याची प्रथा आहे. पोतराजाच्या पोटी जन्माला आलेल्या पोळके

यांनी आपली व आपल्या समाजाची कथा, व्यथा यातून मांडली आहे.

याबरोबरच वडिलभावाच्या शिक्षणासाठी वडिलांनी घेतलेले कष्ट, आपण घेतलेले शिक्षण व कोल्हापूर, सातारा या गांवांनी आपल्यातील सामाजिक कार्यकर्त्याच्या जडणघडणीत केलेली मदत. वडिलांचे रंगीबेरंगी पोषाख घालून भीक मागणे व एका बाजूने पिढ्यानूपिढ्या भोगलेल्या वेदना वर्णन करीत असताना दुसरीकडे व्यक्तिगत जीवनाचे दु:खही लेखक व्यक्त करतो. व्यक्तिगत जीवनापेक्षा समूह जीवनाचे जगणे केंद्रीभूत ठेवून लेखकाने आभरान आकारास आणले आहे. लेखकाला समाज व्यवस्थेच्या विरोधात पोहोण्याचा प्रयत्न करीत असताना थकवा आला तरी त्याने पोहणे सोडले नाही हे आपल्या लक्षात येते. लेखकाने म्हटल्याप्रमाणे 'आभरानच्या चिंध्यासारखा असलेला समाज डोळे उघडे ठेवून बघत राहिलो, प्रत्येक चिंधी पेट घेणारी पण मन जळत नव्हत, उलट या व्यवस्थेविरुध्द लढण्यासाठी ताकद गोळा करीत होतो. मला वाटतं इथेच मला जगण्याचा अर्थ गवसला'. [३२]

अशाप्रकारे आयुष्यात जे पाहिले भोगले परिवर्तनाच्या चळवळीत बारा वर्षे घालविली आणि हे काम एकट्याचे नाही तरीही सामाजिक परिवर्तनाच्या अपेक्षेने, आणि नवा समाज निर्माण होईल या आशेने हे आत्मकथन लिहिले आहे.

**अक्करमाशी** - शरणकुमार लिंबाळे - आत्मकथन लेखकामध्ये वयाने सर्वात लहान असणाऱ्या व रांडेचा पोर म्हणून एका बाजूला अस्पृश्य समाज व अस्पृश्य महार म्हणून सवर्ण समाज ज्याची कुचंबणा करीत होता त्या लेखकांनी हे आत्मकथन लिहिले आहे. कांहीना निदान स्वत:च्या जातीची सुखदु:खे आहेत ती दूर करण्याचा ते प्रयत्न करतात. परंतु ज्याची सवर्णांनी उपेक्षा केली त्या उपेक्षितांनीही लेखकाची उपेक्षा केली. त्यामुळे शरणकुमारच्या दु:खाला एक वेगळीच झालर प्राप्त झाली आहे. आपल्या दु:खाचे मूळ शोधण्याचा प्रयत्न या लेखनातून लेखक करतो आहे. 'बखर एका अक्करमाशीची' या 'अबकडई' या दिवाळी अंकातील लेखात ते म्हणतात, ''सत्तावीस वर्षाच्या आयुष्यातील घटना प्रसंग आणि अनुभव मी पेरलेले आहेत ते उगवले, कांही माजले, कांही गाजर गवतही उगवलं असेल, शेतात केवळ पीकच येत नाही पिकाबरोबर गवत येणारच. ही कथा माझी, व्यथा आईची, आत्मकथा एका समाजाची. अक्करमाशी जितकं माझं खाजगी आयुष्य आहे, तितकच ते वेदनेचं जनरल वॉर्ड आहे.'[३३]

लेखकाचे विवेचन सत्य आहे. जे जीवन तो जगला, तेच त्याने शब्दरूप केले आहे. ते करताना कलाकृती म्हणून आपण कांही लिहित आहोत याचा विचार मनात नव्हता पण आशयाच्या

उत्कटतेमुळहे लेखन टोकदार झाले आहे. बेळगाव, महाराष्ट्र यांच्या सीमा रेषेवरील वास्तव जीवन निंबाळेंनी चित्रित केले आहे. मसामाय, संतामाय, महमूद दस्तगीर, अन्य कुटुंबीय भगभगीत आयुष्य जगतात तरी एका धाग्याने ते बध्द असतात. एकमेकाची घृणित कर्मे विसरुन एकमेकांना दु:खात जपतात, साथ देतात. अक्करमाशीत महारवाड्याचे जीवन आलेले आहे. उपेक्षित व उपऱ्या जीवनाचे सत्याला स्मरून लिहिलेले सामाजिक भान असलेले, संयमालाही काही ठिकाणी ओलांडणारे वाचकाच्या क्षमाशील वृत्तीला आवाहन करणारे हिन्दु धर्म, संस्कृती यांची चर्चा करणारे प्रश्न, लेखकाचे दुभंगलेले व्यक्तिमत्व यात चित्रित झाले आहे. महाराष्ट्र व कर्नाटक सीमा प्रदेशात बोलल्या जाणाऱ्या महारी मराठीचा वापर लेखकाने केला आहे. एखाद्या एकपात्री प्रयोगाप्रमाणेच यातील आत्मनिवेदनाचे स्वरुप आहे.

**बारामाशी -** शरणकुमार लिंबाळेंनी आपला जीवनस्तर बदलल्यानंतर त्यांच्या मनात जी प्रचंड खळबळ चालेली होती त्याची अस्वस्थ कबूली यात दिली आहे. शरण, शरण्या, शरणू, शिवशरण, शिवरणप्पा, शरणबसप्पा, शरणबसवेश्वर या क्रमाने शरणकुमार लिंबाळेंनी आपल्या व्यक्तिमत्वात बदल केलेला आहे.

'मी माझ्यातील दलित ब्राह्मण', कार्यकर्ता आणि कलावंत या परिघात 'स्व' आणि 'स्वेतरांचा' शोध बारामाशीतून घेतला आहे. आपल्या मनातील आंदोलनाला चढत्या हरीने मांडले आहे. 'स्व' च्या स्तर बदलानंतर लेखकाला आपल्या या पांढऱ्या कॉलरखाली किती वेदना गाढल्या आहेत याची जाणीव होते. [३४] एका बाजूने झोपडीत राहणे अशक्य होते तर दुसऱ्या बाजूने शहरातील बंगल्यात गेल्यावर 'उपरे' असल्याची जाणीवही त्यांना होते.

डॉ. आंबेडकरांच्याविषयी कृतज्ञताभाव व्यक्त करुन आपल्या मित्रमंडळीविषयी, वेगवगळ्या ठिकाणी झालेल्या सभा, उद्घाटने, सत्कार इत्यादिविषयी बारामाशीतून माहिती मिळते.

**धुळपाटी** - श्रीरंग तलवारे [३५] यांनी लिहिलेले हे आत्मकथन असून प्राध्यापक रावसाहेब कसबे यांची बारा पानाची प्रस्तावना हीच यातील जमेची बाजू आहे. डॉ. आंबेडकरांच्या प्रेरणेने आपण घेतलेले शिक्षण, त्यावेळची उपासमार, छळ, अवहेलना यांना तोंड देऊन प्राप्त केलेले प्राध्यापक पद याबरोबर अस्पृश्य कुटुंबाचे जिणे आणि कुटुंबीय मंडळीच्या प्रेरणा इत्यादि बाबी या लेखनाच्या केंद्रस्थानी आहेत. याबरोबरच दारिद्र, अज्ञान आणि व्यवसनाच्या खाईत खितपत पडलेला दलित समाज, लेखकाच्या वडिलांच्या पायात सलणारा काटा, भावाला झालेला कॉलरा व मावशीने कर्ज वसूल करण्यासाठी केलेली दांडगाई इत्यादि प्रसंग आलेले आहेत. बोली भाषेची लय गोडवा, अनुभवाशी सुसंवाद साधणारी, चिंतनशीलतची जवळीक करणारी व

लेखकाची अनुभूती समर्थपणे पेलणारी उत्कट अशी भाषा हे या आत्मकथनाचे सामर्थ्य असले तरी त्रोटक वर्णनाने या लेखनाला मर्यादा पडल्या आहेत.

**कोंडाळ** - प्रा. तुषार भाग्यवंत - प्रारंभीच्या शिक्षणापासून ते एम.ए. होऊन सावंतवाडीच्या कॉलेजमध्ये नियुक्ती होईपर्यंतच्या जीवन प्रवासाची व आपल्या समाजजीवनातील विविध पडसादाची हकीगत यात आली आहे. तराळ-अंतरापासून प्रेरणा घेऊन सलग मांडणी केलेली आहे. लेखक शाळेत जात असतानाच वडिलांबरोबरच वाजप करायला जात असे. हे वाजप आपण उपाशीपोटी कसे केले ? शिक्षण कसे पूर्ण केले ? व शिक्षण पूर्ण करुनही लवकर नोकरी कशी मिळाली नाही ? ही नोकरी मिळवताना कसे हाल झाले ? इत्यादि संबंधीची माहिती या आत्मकथनातून मिळते. व अस्पृश्यतेचे कुरुप दर्शन, जीवनात पदोपदी आपल्या जातीला अस्पृश्यतेचा व उपेक्षेचा अनुभव कसा येतो इ. वर्णनाबरोबर यात्रा, देवदैवते, सण-वार इ. चालीरितीचे दर्शन घडते.

**झळा** - ल. स. रोकडे [३७] आपण प्रत्यक्ष भोगलेली अस्पृश्यता, येस्करपाळी मागणे, गावकीची कामे करण्यापासून एलएल.बी होऊन ऑडिट ऑफिसर होईपर्यंतचा प्रवास त्यांनी वर्णन केलेला आहे. व आपले कुटुंब आर्थिक आणि सामाजिक विषमतेच्या झळा सहन करीत आपण केलेली वाटचाल, मध्येच आठ वर्षे शाळा सोडून आपण राखलेल्या शेळ्या मेंढ्या, तरीही वर्गात आपण टिकविलेला पहिला नंबर, परशुराम मास्तरांनी केलेले मार्गदर्शन व ब्राह्मण समाजातील व्यक्तिने केलेल्या उपकाराबद्दल कृतज्ञता लेखकाने व्यक्त केलेली आहे म्हणून डॉ. वि. स. जोग यांनी 'महाराष्ट्रातील वैचारिक, सामाजिक प्रबोधनाला गती देणारे मूलगामी चिंतन हे देखील झळाचे वैशिष्ट्य आहे'.[३८] या शब्दात झळाचा गौरवकेला आहे. प्रस्तुत आत्मकथन चरित्र पध्दतीने लिहिलेले आहे. निवेदनाची एक लय संभाळली आहे. दया पवारांच्या 'बलुतंशी' संबंध जोडला आहे. जे जे अनुभवले ते ते जास्तीतजास्त संयम राखून लिहिलेले आहे.

**उचल्या** - लक्ष्मण गायकवाड - ३९ लातुर जिल्ह्यातील धनेगाव येथे या नायकाचा जन्म झाला. भूक आणि निवाऱ्यासाठी सर्व कायदेशीर रस्ते बंद झाल्यामुळे चोरी करुन जगणारी ही जमात उचल्या या नावाने ओळखली जाते. अशा या जमातीत जन्मलेल्या नॉन मॅट्रिक झालेल्या कार्यकर्त्याचे हे मनोगत आहे. उचल्या ह्या जातीत जन्मल्यामुळे जे दु:खभोग लक्ष्मणच्या वाट्याला आले त्याची झाडाझडती आत्मनिरीक्षण व समाज निरीक्षण या दुहेरी पातळीवरुन करुन हे लेखन केलेले आहे. आपले आजी, आजोबा, आई, वडील, भाऊ इ. चोरी करण्यात घालवलेले आयुष्य, पोलिसाचा खाल्लेला मार आपल्या समाजातील अनिष्ट परंपरा,

रुढी, अंधश्रध्दा याबरोबरच आपल्या वडिलांनी आपल्या हातात दिलेली पाटी-पेन्सिल याबरोबरच एक सामाजिक कार्यकर्ता म्हणून आपले व्यक्तिमत्व कसे घडले इ. तपशील येथे विस्ताराने मांडलेला आहे. समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून या लेखनाकडे पहावे असे मत त्यांनी व्यक्त केले आहे.

**तांडा -** आत्माराम राठोड - तांडा म्हणजे लमाण, बंजारा समाजाचे राहण्याचे वस्तीस्थान होय. विदर्भातील पुसद जवळच्या तांड्याचे चित्रण यात आले आहे. या समाजाची सारी व्यवस्था नायक प्रधान असते. दारु गाळणे हा या समाजाचा मुख्य व्यवसाय असतो. जात पंचायत ही मोठी बाब असून त्याला 'नसाब' म्हणतात. अशा या समाजात लेखक दुध पिण्याच्या वयात दारु पितो, या प्रमाणेच आपला समाज अंधश्रध्दा व दैव वाद यांनी कसा त्रासला आहे. यामुळे दारिद्र्य व आणि अज्ञान यात तो पिळला जातोय, कार्यकर्त्याला कोठे ही स्थान नाही. व वरिष्ठ पुढारी या समाजाला चुकीचे मार्गदर्शन करतात. इ. तपशिल या लेखनात आला आहे. आपल्या साध्या सोप्या शैलीत आत्म शोध लेखकाने या लेखनातून घेतला आहे.

**मान्हुडा -** पा.ऊ. जाधव 'अस्मिता दर्शनाच्या वाचनाने दलित साहित्यीकाच्या आत्मकथनाचे दालन एका आत्मकथनाचे दालन माझ्यासमोर उघडं झालं आणि माझंही जीवन मला माग वळून पाहण्याची आणि आत्मपरिक्षण करण्याची संधी मिळाली.'[४१] असे मनोगत लेखकाने व्यक्त केलेले आहे. यातून 'आठवणीचे पक्षी' या प्र.ई. सोनकांबळे यांच्या आत्मकथन व प्रोत्साहनाने हे लेखन आकाराला आलेले आहे. ज्या कुळात साधी लेखणी कुणी हाती घेतली नाही, त्या दरिद्री कुळातील व्यक्तीने इंग्रजीतून एम.ए. पर्यंत शिक्षण घेणे ही असामान्य गोष्ट याबरोबरच दलित स्त्री जीवनाची होरपळ, लेखकाची आजी, आई यांचे कष्ट व आपल्या समाजातील शैक्षणिक दारिद्रय. लेखकाने शिक्षण घेत असताना सवर्णांनी शिक्षणावर घेतलेले अक्षेप, त्याही परिस्थितीत लेखकाने घेतलेले उच्च शिक्षण, दारिद्र्यामुळे वाट्याला आलेले अपमानास्पद जगणे व विस्थापितांनी नेहमी गुलाम राहिले पाहिजे. ह्या प्रस्थापितांच्या वृत्तीचे दर्शन लेखकाने घडविलेले आहे. मान्हुडा हे वऱ्हाडातील ग्रामीण महारी बोलीचा वापर करुन लिहीलेले आत्मकथन आहे. लेखकाच्या सौम्य व समजूदारपणाचे दर्शन यात घडते. यातील जीवन प्रवास तसा अगदी सरळ रेषेत असला तरी कलात्मकतेपासून हे लेखन दूर गेले आहे.

**जातीला जात वैरी -** ना.म. शिंदे[४२] यांचे हे आत्मकथन असून वीरशैव कक्कैय्या ढोर व महार समाजाचे संघर्ष या बरोबरच स्वातंत्र्य प्राप्तीनंतरही तथाकथीत ढोर, चांभार, महार आणि मांग यांच्यात असणारी स्पृश अस्पृशता व श्रेष्ठ कनिष्ठ भावाचे वर्णन हे या कथनाचे वैशिष्ट्य आहे. इतर सर्व आत्मकथनात दलित आणि सवर्ण यांचा

संघर्ष आहे. तर प्रस्तुत आत्मकथनात दलितां - दलितांमधील संघर्ष रंगविला आहे. म्हणूनच प्रस्तुत आत्मकथनाचे स्वागत करताना अनिरुध्द शांडिल्य म्हणतात की, 'ना.म. शिंदे यांनी आपल्या निरिक्षणातून, प्रत्यक्ष चर्चेतून ज्या गोष्टी टिपल्या, त्या त्यांनी प्रामाणिकपणे व अत्यंत नितळ शैलीत मांडल्या आहेत. कुठेही हातचे राखून ठेवले नाहीत. एका तळमळीच्या कार्यकर्त्याच्या भूमिकेतून त्यांनी लिहीले आहे. त्यांच्या लेखनात भडकपणा नाही. अक्रस्ताळेपणा तर नाहीच नाही आहे ती, सजग चिंतनशील मनाच्या माणसाची तळमळ व प्रामाणिकपणा साऱ्या समाजाच्या उभा आडवा छेद घेणारे समाज चित्रण करणारे हे पुस्तक वेगळेपणामुळे उठून दिसणारे आहे.' [४३] श्री. शांडिल्य यांचे हे मुल्यमापन म्हणूनच योग्य वाटते.

**कोल्हाट्याचं पोर** - डॉ. किशोर काळे [४४] या उच्च शिक्षित लेखकाने आपल्या कुटुंबाची, समाजातील स्त्रियांच्या जीवनाचे चित्रण समर्थपणे रेखाटले आहे. आपल्या समाजातील स्त्रिया व त्यांचे परपुरुषाशी असणारे संबंध व या संबंधापर्यंतची निर्माण होणारी परिस्थिती, उपासमार व वृध्दत्व इत्यादिचे चित्रण करुन शिक्षण घेत असताना आलेली संकटे व खासदार लोणी यांनी केलेली मदत याविषयीचे वर्णन यात आलेले आहे.

**अंतस्फोट** - प्रा. सौ. कुमुद पावडे - यांचे हे आत्मकथन असून क्रमश: लेखाच्या रूपाने ते आकाराला आलेले आहे. आपणाला कळू-सवरू लागल्यापासून ते विवाहापर्यंत व नोकरी लागेपर्यंतच्या कौटुंबिक जीवनाचे सामाजिक जीवनाच्या अनुषंगाने चित्रण केले आहे. 'आपण सद्सदविवेकबुध्दी जागृत ठेवणारी व्यक्ती असून त्या भावनेतूनच हे लेखन साकारले आहे.' [४५]

या बरोबरच जात बांधवाकडून मिळालेली वागणूक, शिक्षणामुळे दलित समाजात झालेले परिवर्तन, तरीही या सनाजात असणारे मूळचे दोष उच्च शिक्षित दलित वर्गाकडून स्वत:च्या समाजाकडे होणारे दुर्लक्ष, व दलित नेत्यांनीच आंबेडकरांच्या विचारांची लावलेली वासलात याकडे लेखिकेने लक्ष वेधलेले आहे. प्रस्तुत लेखनातून लेखिकेच्या वास्तव व चिंतनशील दृष्टीकोनाचा परियच होतो. आत्मपरिक्षणाची जोड देऊन, परिवर्तनाची दिशा दाखवून समाजाला विचारप्रवृत्त करण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे.

**मिटलेली कवाडे** - मुक्ता सर्वगोड [४६] दलित म्हणून जन्माला आलेल्या परंतु संस्काराने दलित नसणाऱ्या एका समाज सेविकेचे हे आत्मकथन आहे. यात समाज दर्शन घडवावे, समाजाला शहाणे करावे समाजसेवा करताना होणाऱ्या चुका व समाजसेवेच्या खऱ्या गरजा, उणिवा वाचकासमोर मांडण्याचा हेतू आहे. याबरोबरच समाजसेवेसाठी लागणारे पर्यायही सुचविले आहेत. जातीच्या आधारे सवलती मिळवून मोठे होणाऱ्यांची

त्यांनी कीव केली आहे. दलित समाजाचे नेतृत्व, समाजकार्य कसे चिखलात रुतले आहे हे ही स्पष्ट केले आहे.

**जिणं आमुचं** - बेबी कांबळे - प्रस्तुत आत्मकथन म्हणजे पन्नास वर्षापूर्वीच्या पश्चिम महाराष्ट्रातील महार समाजाचे व प्रामुख्याने स्त्री जीवनाच्या दु:खाचे चित्रण करणारे आत्मकथन आहे. याबरोबरच या समाजातील अल्पवयीन विवाह, तिच्यावर वरचष्मा ठेवणारी सासू, प्रसंगी सूनेचे कापले जाणारे नाक याबरोबरच या समाजातील देव:देवर्षी, अंगारे धुपारे, अंगात येणे, पोतराज सोडणे, देव-देवतांना तुष्टविणे या भयावह रूढी परंपरेचे चित्रण आलेले आहे. याबद्दल ते म्हणतात, पन्नास वर्षाच्या काळातील मला कळत असणाऱ्या बारीकसारिक गोष्टी न लाजता व पन्नास वर्षाच्या काळातील महाराचे जिणे प्रत्यक्ष कसे होते, तो कसा गुलाम झाला होता व गुलामीच्या बेड्या हातात आडकावून जगणारी खरीखुरी देशाची लेकरं कसल्या अग्नीदिव्यातून बाहेर पडली आहेत हे भावी पिडीला कळायला हवे.'[४७] म्हणूनच प्रस्तावनेत मॅक्सिन बर्नसन यांनी 'वाङ्मय म्हणून जिणं आमचं कमी दर्जाचे ठरेल. कारण बेबी कांबळेचा पिंड ललित लेखिकेचा नसून समाज शास्त्रज्ञाचा आहे. समाज जीवनाचे निरीक्षण बारकाईने करण्याचा नाद त्यांना होता. स्वत:च्या समाजाचे डोळस आणि सहानुभूतीपूर्वक निरीक्षण या पुस्तकात मांडल्यामुळे प्रस्तुत आत्मकथन समाज शास्त्रज्ञ आणि इतिहासकाराच्या दृष्टिने एक अमोल खाण ठरेल'[४८] असे म्हटले आहे व त्याची प्रचितीही वाचकाला येते. अशाच प्रकारे 'जिणं आमुचं म्हणजे दलित स्त्री जवीनाचा मार्मिक आत्मशोध' [४९] असल्याचे सौ. भारती निरगुडकर यांनी म्हटले आहे. तर 'गाठोड्यातून सोडून सांगितलेल्या आठवणीसारखं नादबध्द प्रतिपादन', [५०] या शब्दांनी अनिल जोशींनी जिणं आमुचं चा गौरव केलेला आहे.अशा प्रकारे आपल्या समाजातील स्त्री जीवनाच्या विविध रुढी परंपराचा विचार वाचकासमोर मांडलेला आहे.

**प्रस्तुत आत्मकथनांची वैशिष्ट्ये -**

**१. वेदना** - दलित आत्मकथनांचा विचार करीत असताना, एक गोष्ट लक्षात येते की, या आत्मकथनाच्या माध्यमातून आपल्या वेदना त्यांनी समाजासमोर मांडल्या आहेत. युगानुयुगे ते गावकुसाबाहेर राहिले, तांब्याभर पाण्यासाठी मैलोनमैल पायपीट त्यांनी केली, सवर्णांनी या समाजातील स्त्रियांचा वेळोवेळी उपयोग व उपभोग घेतला. गावातून वरात निघाल्यावर त्याच्यावर दगडफेक केली. शाळा शिकत असताना ऊन, पाऊस वाऱ्यात व्हरांड्यात बसावे लागले. दलित म्हणून सवर्णांनी त्यांच्या कामाचा मोबदला नाकारला अशा प्रकारे या आत्मकथनातून आपल्या वेदना त्यांनी समाजासमोर मांडल्या आहेत व मानवाच्या अभ्युदयाची वेळोवेळी



13521
A

घोषणा करणारी हीच का ती संस्कृती ? मनूने असे का लिहिले ? असे अनेक प्रश्न, जाणवलेले काळजात सललेले शब्दरुप केले आहे. म्हणूनच नारायण सूर्वे म्हणतात -

'थोडे साहिलेले, पाहिलेले, जोखिलेले आहे
माझ्या जगाची एक गंधवेणाही त्यात आहे
केंव्हा चुकलो, मुकलो, नवे शिकलो आहे
जसा जगत आहे. तसा शब्दात आहे.'[५१]

२. **अस्मितेचा शोध** - डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नेतृत्व दलित समाजाला मिळाले व त्यांनीच 'शिका, संघटित व्हा, संघर्ष करा' हा मंत्र दिला व वतनदारीच्या मागे लागू नका. मेलेली गुरे ओढू नका, मांस सेवन करू नका ही शिकवण दिली. त्यामुळे या समाजात एक जागृती निर्माण झाली, चैतन्य निर्माण झाले व मी माणूस आहे, मला मनुष्य म्हणून जगण्याचा अधिकार आहे ही जाणीव निर्माण झाली व त्यामुळेच या मंडळींनी लेखणी हातात घेऊन आपल्या अस्मितेचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

३. **सामुहिकता** - स्वतःच्या अस्मितेच्या शोधाबरोबरच 'स्वसमाज'ही त्यांच्या लेखणीतून साकार झाला आहे. यातील 'स्व' ला नाममात्र स्थान आहे. 'स्वसमाज' मात्र विस्ताराने चिंतनात्मक दृष्टिकोनातून साकार झालेला आहे. अशा प्रकारे सामुहिकतेचा स्वीकार या सर्व लेखनातून झालेला दिसतो

४. **प्रांजळ निवेदन** - प्रांजळ निवेदन हे या आत्मकथनाचे अत्यंत महत्वाचे वैशिष्ट्य आहे. आपल्या आयुष्यातील दुखःभोगाची अभिव्यक्ती करताना कोणताही आडपडदा न ठेवता, कमीपणा न मानता आपले अनुभव, आपली व्यसने, आपला व्याभिचार, आपल्या डोळ्यादेखत आपल्या आईबहिणीचा सवर्णांनी घेतलेला उपभोग, भाकरीसाठी पत्करलेली लाचारी, आपला शृंगार त्यांनी निर्भिडपणे प्रांजळ मनाने निवेदन केलेला आहे.

५. **विद्रोहाची भावना** - दलित लेखक साहित्याकडे एक हत्यार म्हणून पाहतो आहे व त्या हात्यारानेच या समाज व्यवस्थेत बदल व्हावा ही त्यांची भावना आहे. म्हणून परंपरा व समाज व्यवस्थेविरुध्द एक विद्रोहाची भावना त्यांच्या साहित्यात वेळोवेळी व्यक्त होतो. प्रसंगी दोन हात करण्याचीसुध्दा त्यांची तयारी आहे. युगानुयुगे त्यांची माणुसकी नाकारली, हागणदारीत रहावे लागले, श्रमाचा मोबदला नाकारला, ऊन - पाऊस वाऱ्यात थांबून शिक्षण घ्यावे लागले. लग्नाच्या पंक्तीत उकीरड्यावर बसून जेवण उरकावे लागले व रोजगारासाठी गेल्यानंतर आयाबहिर्णींचा मन मानेल तसा सवर्णांनी उपभोग घेतला. या सर्व यातनातून मुक्त

होऊन माणूस म्हणून त्यांना सुखी, समाधानी जीवन जगायचे आहे. पण हे सहजासहजी शक्य नाही म्हणून नामदेव ढसाळ म्हणतात त्याप्रमाणे,

> 'माणसाने प्लेटो, आइन्स्टाईन, आर्किमिडीज, सॉक्रेटिस
> मार्क्स, अशोक, हिटलर, बिटलर, कामू, सार्त्र, काफ्का,
> बोदलेयर, रेम्बो, इझरा, हॉपकिन्स, गटे, दोस्तएव्हस्की,
> मायकोव्हस्की, गार्की, एडिसन, मेडिसन, कालिदास,
> तुकाराम, व्यास, शेक्सपिअर, ज्ञानेश्वर वगैरे त्यांच्या शब्दासकट
> गटाराचे मेनहोल उघडून त्यात सलग सडत ठेवावे'[५२]

प्रस्तापिताशी दोन हात करण्याची त्यांची अशाप्रकारे तयारी आहे.

६. **आत्मनिष्ठा आणि वस्तुनिष्ठा** - दलित आत्मकथनात लेखकाच्या आत्मनिष्ठेबरोबरच वस्तुनिष्ठतेचे दर्शन घडते. व वस्तुनिष्ठतेमुळे तटस्थतेचा गुण या लेखनाला प्राप्त झालेला दिसतो व आत्मनिष्ठेचे भावकाव्यातील भावनेप्रमाणे सामान्यीकरण झालेले दिसते. यातील 'स्व' ला 'आम्ही' चे रूप प्राप्त झालेले आहे व हा 'स्व' व्यक्तिगत व प्रातिनिधिक अशा दोन्ही जाणिवांचा प्रत्यय देणारा आहे.

७. **ध्येयनिष्ठा** - दलित लेखकांनी लेखन करीत असताना आपल्या मनातील वेदना, विद्रोह व नकाराची भाषा व्यक्त केली. त्याबरोबरच डॉ. आंबेडकर, बुध्द, मार्क्स, कर्मवीर भाऊराव पाटील इ. विषयी कृतज्ञता भाव व्यक्त केला. त्याबरोबरच आपण कोण, आपणाला कोठे जायचे आहे, जाण्याचा मार्ग कोणता, त्यासाठी कोणाचे मार्गदर्शन आवश्यक आहे इ. विषयी सखोल चर्चा केली आहे. त्यांना माणसाचे गाणे गायचे आहे. मनुष्याला महान बनवायचे आहे.

> 'जळलेले आयुष्य पुन्हा निखाऱ्यासारखे फुलवायचे,
> म्हणून प्रकाशाची पायवाट मी जवळ केली आहे.'[५३]

ही ध्येयनिष्ठा त्यांच्या लेखनातून व्यक्त झाली आहे.

८. **त्रिकाल दर्शन** - दलित लेखकांनी आपल्या लेखनातून आपण अनुभवलेला भूतकाळ, त्याची दाहकता, यशापयाशाची वेदना, सामुहिकता व्यक्त केलेली आहे. व वर्तमानकाळाचे जीवन चित्रीत केले आहे. त्याबरोबरच भविष्यकाळाची सुंदर स्वप्ने, आशावादी दृष्टीकोन व्यक्त केला आहे.

**९. बहुरंगी बहुरंगी जीवनाचे चित्रण -** प्रस्तुत आत्मकथनातून आपणाला बहुरंगी, बहुढंगी, बहुभाषिक जीवनाचा परिचय होतो. दया पवार, सोनकांबळे, लक्ष्मण गायकवाड इ. नी मराठवाडा, विदर्भ, खानदेशातील जीवन तर, शरणकुमार, ना. म. शिंदे, लक्ष्मण माने, पार्थ पोळके, इ.नी सांगली, सातारा, सोलापूर, कोल्हापूरकडील जीवन चित्रित केले आहे. तर कोंडविलकरांनी कोकणचा प्रदेश साकार केला आहे. पुरुषाप्रमाणे स्त्रियांनीही लेखणी हातात घेतली आहे व यामुळेच वेगवेगळ्या भाषा, विवाहपध्दती, देवदेवता, यात्रा, श्रध्दा अंधश्रध्दा, विविध जाती संप्रदाय आपणाला अनुभवायला मिळतात.

**१० स्त्री जीवनाची दाहकता -** दलित आत्मकथनातून वेळोवेळी आपल्या नजरेत येणारे वैशिष्टय म्हणजे या समाजातील भयावह असे स्त्री जीवन. यातील स्त्री अहोरात्र काबाडकष्ट करणारी, शिक्षणाची आस्था असणारी, डॉ. आंबेडकरांना समजून घेणारी व आपल्या कष्टातूनच एके दिवशी आपला संसार बहरणार आहे अशी अशावादी दृष्टी उराशी बाळगून जीवन जगणारी, त्यासाठी वाट्टेल ते कष्ट उपासमार करणारी स्त्री आपल्या लक्षात येते.

**११. नकार -** दलित लेखकांनी आपल्या लेखनातून प्रस्थापितांना आजपर्यंत झाले ते ठिक झाले, पण यापुढे हे चालणार नाही, मेलेली गुरे व त्यांचे मांस आम्हाला नको आहे, वतनदारी नको, येस्करकी, रामोसपण व त्यांचे शिळे तुकडेही नको, आम्हाला न्याय हवा आहे, माणूसकी हवी आहे, माणसाचे गाणे आम्हाला गावयाचे आहे. असा विचार व्यक्त केला आहे.

अशाप्रकारे दलित आत्मकथनांचा, त्यांच्या स्वरूप, वैशिष्टयांचा, अभ्यास केल्यानंतर त्यांच्या मर्यादाचाही विचार करावा लागतो. सर्वप्रथम जाणवणारी गोष्ट म्हणजे या आत्मकथनकारात बहुतेक लेखक एका विशिष्ट जातीचे म्हणजे महार जातीचे आहेत. त्यामुळे एक प्रकारची कंपूशाही निर्माण झाल्याचे चित्र आपल्या नजरेला येते. परिवर्तनाच्या प्रवाहात इतर अस्पृश्य येताना दिसत नाहीत. किंबहुना यांनीच त्यांना मज्जाव केल्याचे दिसते. याप्रमाणेच दलित स्त्रियांमधील शिक्षणाचे प्रमाण, सुधारणा खूपच कमी व प्रगतीच्या दृष्टीने त्यांची झेप मर्यादित दिसते. यामागे या समाजातील पुरुष मंडळीच आहेत असे आपल्या लक्षात येते. या लेखनात 'स्व' बरोबरच स्वसमाज आलेला आहे हे योग्यच आहे. पण या कक्षेबाहेर जाऊन एकही लेखक लेखन करताना दिसत नाही. याप्रमाणेच कारण नसताना सवर्ण समाजातील रूढी, परंपरा, प्रथा, धर्म, संस्कृती इ. विषयी अत्यंत घृणास्पद वर्णने केलेली आहेत. या आत्मकथनकारापैकी एकाही लेखकाने आत्मकथेच्या पुढे जाऊन लेखन केलेले नाही. कादंबरी, महाकाव्य, खंडकाव्याचे लेखन केलेले दिसत

नाही. तर आत्मकथनाच्या परिघात ते रेंगाळताना दिसतात. या आत्मकथनकारात शिक्षण घेत असताना जी सामाजिक जाणीव, समाजकार्य करण्याची जिद्द व तळमळ होती ती जिद्द, तळमळ नोकरी लागल्यानंतर दिसत नाही. किंबहुना नोकरी लागल्यानंतर ही मंडळी आडनावे बदलून सवर्ण समाजाच्या वस्तीत रहायला जातात. आपल्या आईवडिलांना, समाजाला ते विसरतात याप्रमाणेच या आत्मकथनाच्या लेखनानंतर मिळालेल्या प्रसिध्दीमुळे अनेक लेखकांनी राजकाराणात प्रवेश करुन समाज व समजाऋण अमान्य केलेले आहे. त्यामुळेच दलित समाजाच्या प्रगतीच्या मार्गात दलित मंडळीच मैलाच्या दगडासारखी रूतून बसलेली आहेत हे विदारक सत्य लक्षात येते.

# संदर्भ टिपा


१) दलित साहित्य संमेलने, स्मरणिका - म. ना. वानखेडे, अध्यक्षीय भाषण. १९७६, नागपूर. पृ. ६७.

२) दलित साहित्याच्या निमित्ताने - सदा. कऱ्हाडे. सत्यकथा, जुलै १९७० मुंबई. पृ. २३.

३) आम्ही, दिवाळी अंक - नामदेव ढसाळ, १९७३, मुंबई. पृ. ७७

४) चिंतन दलित साहित्याचे - गो. म. कुलकर्णी, विशाखा, दिवाळी अंक १९८४, मुंबई. पृ . १३५.

५) दलित साहित्य संमेलन, स्मरणिका - बाबूराव बागुल, १९७६, नागपूर पृ. २८० - ८१.

६) दलित साहित्य जेंव्हा चळवळ बनते - योगेंद्र मेश्राम, प्रचार प्रकाशन, प्र.आ १९८७, कोल्हापूर.पृ. १९.

७) नव वाङ्मयीन प्रवृत्ती आणि प्रमेये - रा. ग. जाधव,कॉन्टिनेन्टल प्रकाशन,१९७२, पुणे. पृ. २.

८) दलित स्वकथने साहित्य रूप - प्रा. डॉ. कुसरे-कुलकर्णी, विजय प्रकाशन, नागपूर. प्र. आ. १९९१, पृ. २९.

९) माझे आत्मकथन, तराळ-अंतराळ - शंकरराव खरात, अस्मिता दर्श आत्मकथा विशेष अंक, १९८३, पृ. १३१.

१०) दलित साहित्य प्रेरणा आणि प्रवृत्ती - शंकरराव खरात, इनामदार बंधु प्रकाशन, पुणे - ३०. पृ. २८.

११) जुलुस - फ. मु. शिंदे, श्री विद्या प्रकाशन, २५०, शनिवार पेठ, पुणे. द्वितीय आ. १९८२, पृ. १४

१२) भगवान बुध्द आणि त्यांची शिकवण - स्वामी विवेकानंद, रामकृष्ण मठ, नागपूर. प्र. आ. १९८६, पृ. ३, ६, १४.

१३) मार्क्सवाद आणि मराठी साहित्य - वि. स. जोग, विजय प्रकाशन, नागपूर. प्र. आ. १९८१, पृ. ३.

१४) कोंडवाडा - दया पवार, प्रस्तावना, मेहता पब्लिशिंग हाऊस, १२१६, सदाशिव पेठ, पुणे.

१५) विद्रोही कविता - केशव मेश्राम, मेहता पब्लिशिंग हाऊस, १२१६, सदाशिव पेठ, पुणे. प्र. आ. १९७४. पृ. २८.

१६) जुलुस - फ. मु. शिंदे, श्री. विद्या प्रकाशन, २५०, शनिवार पेठ, पुणे. द्वि. आ. १९८२. पृ. १७.

१७) दलित साहित्याच्या निमित्ताने - सदा. कऱ्हाडे, अभिनव प्रकाशन, मुंबई. प्र. आ. १९८२, पृ. १५.

१८) दलित साहित्य दिशा आणि मार्क्सवाद - ल. स. रोकडे, अस्मिता दर्श, ऑक्टो., नोव्हें., डिसें. १९८७, औरंगाबाद. पृ. ९

१९) अस्मिता दर्श - भाई माधवराव बागल, एप्रिल, मे, जून १९७९, औरंगाबाद. पृ. ९.

२०) आंबेडकर, मार्क्सवाद व दलित साहित्य - वि. स. जोग, सुबोधी प्रकाशन, मुंबई, प्र. आ. १९८५, पृ. ३२.

२१) बलुतं - दया पवार, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, प्र. आ. १९७८,

२२) आठवणीचे पक्षी - प्र. ई. सोनकांबळे चेतना प्रकाशन, औरंगाबाद प्र. आ. १९७९, पृ. १७६.

२३) आठवणीचे पक्षी, प्रस्तावना - बाबुराव बागूल उनि, पृ. १६.

२४) मु. पो. देवाचे गोठणे - माधव कोंडविलकर मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, प्र. आ. १९७९, पृ. २२.

२५) मु. पो. देवाचे गोठणे - वि. श. चौगुले, ललित, मार्च १९९०, मुंबई, पृ. २१.

२६) उपरा - लक्ष्मण माने,ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, प्र. आ. १९८०, पृ. १०.

२७) परिवर्तनाच्या संघर्षातील सौंदर्य, उपरा - बा. ह. कल्याणकर, अस्मिता दर्श, दिवाळी अंक, १९८३, पृ. ३७.

२८) काट्यावरची पोटं - उत्तम बंडु तुपे, मेहता पब्लिशिंग हाऊस, १२१६, सदाशिव पेठ, पुणे, पृ. १६.

२९) फांजर - सिंधु झोडगे मुंबई, फेब्रु.१९८२, पृ. १८-१९.

३०) गबाळ - दादासाहेब मोरे , श्री विद्या प्रकाशन, २५०, शनिवार पेठ, पुणे. प्र. आ. १९८२, पृ. ६२.

३१) गावकी - रुस्तुम अचलखांब, श्री विद्या प्रकाशन, २५०, शनिवार पेठ, पुणे. प्र. आ. १९८३, पृ. २०.

३२) आभरान - पार्थ पोळके ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, प्र. आ. १९८३, पृ. ३६.

३३) बखर एका अक्करमाशीची - शरणकुमार लिंबाळे, अबकडई - दिवाळी अंक १९८६, मुंबई, पृ. ५२-५३.

३४) बारामाशी - शरणकुमार लिंबाळे, श्री विद्या प्रकाशन, २५०, शनिवार पेठ, पुणे प्र. आ. १९८८, पृ. ५९.

३५) धुळपाटी - श्रीरंग तलवारे, मान सन्मान प्रकाशन, पुणे प्र. आ. १९८५,

३६) कोंडाळ - प्रा. तुषार भाग्यवंत, अजब पुस्तकालय, कोल्हापूर, प्र. आ. १९८६,

३७) झळा - ल. स. रोकडे,अनघा प्रकाशन, ठाणे
प्र. आ. १९८६,

३८) दलित आत्मकथेचा लक्षणीय आयाम झळा. - वि. स. जोग, नागपूर पत्रिका, साप्ताहिक, २० सप्टें. १९८७, पृ. ६.

३९) उचल्या - लक्ष्मण गायकवाड, श्री विद्या प्रकाशन, २५०, शनिवार पेठ, पुणे. प्र. आ. १९८७, पृ. १८८

४०) तांडा - आत्माराम राठोड अभिजीत प्रकाशन, नागपूर,
प्र. आ. १९७९,

४१) माऱ्हुडा - पा. ऊ. जाधव,मिलिंद प्रकाशन, वसारी,
प्र. आ. १९८६,

४२) जातीला जात वैरी - ना. म. शिंदे, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई
प्र. आ. १९९०-९१, पृ.

४३) दखल, महाराष्ट्र टाईम्स - अनिरुद्ध शांडिल्य, रविवार पुरवणी, २९ जुलै १९९०.

४४) कोल्हाट्याचं पोर - डॉ. किशोर काळे, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई,
प्र. आ. १९७८, पृ.११६.

४५) अंत:स्फोट - प्रा. सौ. कुमुद पावडे, आनंद प्रकाशन, जयसिंगपुरा, औरंगाबाद, पृ. ३१.

४६) मिटलेली कवाडे - मुक्ता सर्वगोड, चेतश्री प्रकाशन, अंमळनेर
प्र. आ. १९८२,

४७) जिणं आमुचं - बेबी कांबळे रचना - रविंद्र प्रकाशन, पुणे
प्र. आ. १९८६, निवेदन पृ.१.

४८) जिणं आमुचं - बेबी कांबळे उनि पृ. १.

४९) दलित स्त्री जीवनाचा मार्मिक आत्मशोध - भारती निरगुडकर महाराष्ट्र टाईम्स, रविवार पुरवणी, ११-१-१९८७, पृ. ३.

५०) जिणं आमुचं, परीक्षण - अनिल जोशी, तरुण भारत आवृत्ती, नोव्हें. १९८६, पृ. १०.

५१) ऐसागा मी ब्रह्म, प्रस्तावना - नारायण सुर्वे, पॉप्युलर प्रकाशन, ३५ सी, ताडदेव रोड, मुंबई. प्र. आ. १९६२, पृ. ७५.

५२) गोलपीठा - नामदेव ढसाळ, मेहता पब्लिशिंग, पुणे. प्र. आ. १९७२, पृ. ५५

५३) दलित साहित्य वेदना आणि विद्रोह - भालचंद्र फडके, श्री विद्या प्रकाशन, २५०, शनिवार पेठ, पुणे. प्र. आ. १९७७, पृ. १२५.